CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २८५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# केवळ अपमानास्पद भाषा वापरल्याने ‘अ‍ॅट्रॉसिटी’चा गुन्हा होत नाही!

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केवळ अपमानास्पद भाषा वापरणे हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा ठरू शकत नाही. जोपर्यंत संबंधित व्यक्तीचा अपमान करण्यामागे तिची ’जात’ हे कारण नसते किंवा तिला जातीवरून कमी लेखण्याचा हेतू नसतो, तोपर्यंत केवळ अपमानास्पद शब्द वापरले म्हणून हा कायदा लागू होत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाचे न्या. जे.बी. पारडीवाला आणि न्या. आलोक आराधे यांच्या खंडपीठाने दिला.



संबंधित प्रकरणात एफआयआर किंवा दोषारोपपत्रात आरोपीने जातीवाचक शिवीगाळ केल्याचा किंवा जातीवरून अपमान केल्याचा कोणताही ठोस उल्लेख नसतानाही ही कारवाई सुरू ठेवण्यात आली होती. या प्रकरणी सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयाने चूक केली, असे निरीक्षणही खंडपीठाने नोंदवले. एका अंगणवाडी केंद्रात शिवीगाळ आणि मारहाण केल्याचा आरोप आरोपीवर होता. संबंधितावर भारतीय दंड विधानाच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी पाटणा उच्च न्यायालयाने आरोपीने दाखल केलेली याचिका फेटाळली होती. याविरोधात संबंधिताने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

# कर्नाटकच्या डीजीपीवर निलंबनाची कार्यवाही

**बेंगळुरू/वृत्तसंस्था :** कर्नाटक पोलीस दलातील एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला असून, राज्याचे पोलीस महासंचालक (नागरिक हक्क अंमलबजावणी) रामचंद्र राव यांना राज्य सरकारने तातडीने निलंबित केले आहे.



गेल्या काही दिवसांपासून रामचंद्र राव यांचे काही आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. या व्हिडिओंमुळे पोलीस प्रशासनाची प्रतिमा मलीन झाल्याचा ठपका ठेवत सिद्धरामय्या सरकारने ही कडक कारवाई केली आहे. सोमवारी सोशल मीडियावर काही व्हिडिओ क्लिप्स व्हायरल झाल्या, ज्यामध्ये वरिष्ठ आयपीएस अधिकारी रामचंद्र राव हे वेगवेगळ्या महिलांसोबत अश्लील कृत्ये करताना दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. हे व्हिडिओ सार्वजनिक होताच कर्नाटकच्या प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाचे गांभीर्य आणि नैतिकतेचा मुद्दा लक्षात घेऊन गृह विभागाने चौकशीचे आदेश देत राव यांना पदावरून दूर केले आहे.

# प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर ऐतिहासिक समारंभ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत यावर्षी ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहे आणि या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून कर्तव्य रेषेवर परेड आयोजित करण्यासाठी एक अभूतपूर्व पुढाकार घेण्यात आला आहे. सरकारने या राष्ट्रीय उत्सवाचे साक्षीदार होण्यासाठी विविध क्षेत्रातील सुमारे १० हजार विशेष पाहुण्यांना आमंत्रित केले आहे.

देशाच्या विकासात अमूल्य भूमिका बजावणाऱ्या नागरिकांच्या असाधारण योगदानाचा सन्मान करण्यासाठी हे आमंत्रण एक महत्त्वाचे पाऊल आहे. आमंत्रित विशेष पाहुण्यांच्या निवडीमुळे समाजातील त्या घटकांना प्राधान्य देण्यात आले आहे, ज्यांनी त्यांच्या कठोर परिश्रम, नाविन्य आणि समर्पणाने देशाला अभिमानास्पद कामगिरी बजावली आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाल्याच्या निमित्ताने प्रजासत्ताक दिन हा भारतासाठी एक अत्यंत महत्त्वाचा राष्ट्रीय सण आहे. या दिवशी भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक बनला. दरवर्षी, दिल्लीतील राष्ट्रीय महामार्गावर एका भव्य परेडसह हा दिवस साजरा केला जातो, ज्यामध्ये देशाचे लष्करी सामर्थ्य, सांस्कृतिक विविधता आणि कामगिरीचे प्रदर्शन केले जाते. १० हजार विशेष पाहुण्यांना आमंत्रित करण्याचा निर्णय हा समावेशक भारताच्या निर्मितीच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. जागतिक पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपचे विजेते, नैसर्गिक शेती करणारे शेतकरी आणि गगनयान आणि चांद्रयान सारख्या इस्रो मोहिमेत सहभागी असलेले शास्त्रज्ञ देखील समाविष्ट आहेत.







# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नगरसेविका सौ. अदिती पाटील कव्हेकर यांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० जानेवारी :** लातूर शहर महानगरपलिकेच्या नगरसेवकपदी सौ.अदिती अजित पाटील कव्हेकर यांची निवड झाल्याबद्दल अखिल भारतीय वीरशैव वाणी लिंगायत संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष गुलाब पाटील यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, नूतन नगरसेविका सत्यवती संतराम चेवले, अखिल भारतीय विरशैव लिंगायत वाणी समाजाचे लातूर शहराध्यक्ष महेश तोंडारे, भाजपा किसान मोर्चा शहर जिल्हाध्यक्ष तानाजी झुंजे पाटील, लातूर तालुकाध्यक्ष बालाजी बुलबुले, लातूर जिल्हा उपाध्यक्ष कल्याण घुगरे, लातूर जिल्हा शहर उपाध्यक्ष गुरूनाथ मिरजगावे, लातूर जिल्हा युवा अध्यक्ष विश्वासदादा अंबेकर, कमलकिशोर मंत्री आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गुलाब पाटील यांनी सौ. कव्हेकर यांच्या भावी राजकीय कारकीर्दीस शुभेच्छा देऊन त्यांच्याकडून समाजोपयोगी कामे गतीने होतील, असा विश्र्वास व्यक्त केला. या सत्काराला उत्तर देताना अदिती कव्हेकर यांनी ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सामान्यांच्या हितासाठी विविध विकास कामे राबविण्यावर आपण भर देऊ असे सांगितले.



# कचरापेटीतून घडवून आणली स्वच्छतेची कार्यशाळा !

### आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** स्वच्छ आणि सुंदर शहर घडवण्यासाठी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एक आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. चित्रकला आणि कचरा प्रश्न प्रबोधन हे दोन्ही उद्देश साध्य करत विद्यार्थ्यांनी तब्बल ३०० कचरापेट्या रंगवून त्यावर अर्थपूर्ण चित्रे व संदेश रेखाटले.

वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनाबरोबरच कचरा व्यवस्थापनावर विशेष लक्ष केंद्रित करणाऱ्या आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनकडून शहरात विविध ठिकाणी मोफत कचरापेट्यांचे वाटप सुरू आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना कचरा प्रश्नांची जाणीव व्हावी व प्रत्यक्ष कृतीतून प्रबोधन घडावे, या उद्देशाने चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मंगळवारी जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात कचरापेट्या रंगवत "Use me', 'माझा खाऊ मला द्या' यासारखे संदेश देत स्वच्छतेचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचवला.



यावेळी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन तर्फे बाळासाहेब बावणे यांनी विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगितले. घरातील व दुकानातील कचरा इकडे-तिकडे न फेकता कचरापेटीतच टाकावा, उघड्या प्लॉटवर, रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला कचरा फेकल्याने शहर अस्वच्छ होते, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

कचरा कचरापेटीत साठवून घंटागाडी आल्यानंतर त्यातच द्यावा, तसेच ही बाब विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन बावणे यांनी केले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. पवन लड्डा, दयाराम सुडे, बालाजी उमरदंड, मयुरी काळे, एड. किरण चिंते, सुवर्णा महाजन, दिपक नावाडे तसेच जिजामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक देविदास कोल्हे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेला हा उपक्रम स्वच्छतेचे संस्कार रुजवणारा आणि शहराच्या कचरा व्यवस्थापनासाठी दिशादर्शक ठरणारा असल्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## शिक्षकांच्या ऑनलाईन जिल्ह्यांतर्गत आंतरजिल्हा बदल्या लवकरच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** जिल्हा परिषद शिक्षकांची ऑनलाईन जिल्ह्यांतर्गत व आंतरजिल्हा बदली प्रक्रिया २०२६ लवकरच सुरू होणार असून, व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे तशा आशयाच्या सूचना संबंधित जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. . वर्ष २०२६ च्या आगामी जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रियेच्या अनुषंगाने ७ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या पत्रान्वये वेळापत्रक व १८ जून २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील विविध मुद्यांबाबत चर्चा झाली. जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रिया २०२६ संबंधी कार्यवाही करताना शिक्षण आयुक्तांकडून २०२५-२६ ची संचमान्यता प्राप्त होताच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन व समानीकरण याबाबतची कार्यवाही ७ नोव्हेंबर २०२४ च्या वेळापत्रकानुसार करायची आहे. सर्व जिल्हा परिषदांनी जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रियेकरिता शिक्षकांच्या याद्या प्रसिद्ध करायच्या असून, प्राप्त आक्षेपांवर निर्णय घेणे, याबाबतची कार्यवाही ३१ मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करायची आहे. ज्या जिल्हा परिषदांनी अवघड क्षेत्र घोषित केलेले नाही, अशा जिल्हा परिषदांनी १५ मार्चपर्यंत अवघड क्षेत्र घोषित करण्याची कार्यवाही करायची आहे. अवघड क्षेत्राच्या निकषांत भौगोलिक व स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन बदल करण्याचे अधिकार सीईओंच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आले आहेत. यात ३ अटींची पुर्तता होणे आवश्यक असून, शिक्षण आयुक्त यांच्याकडून संचमान्यता प्राप्त होताच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून त्यानुसार अद्ययावत बिंदू नामावल्या पोर्टलवर अपलोड करण्यास सूचवले आहे.

## जिल्हास्तरीय निवडणूक खर्च सनियंत्रण कक्ष

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** जि. प., पं. स. निवडणुकीत उमेदवार व राजकीय पक्षांचा होणारा खर्च मर्यादेत होण्याची कार्यवाही करण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हास्तरीय निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सुद्धा संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अधिनस्थ निवडणूक खर्च कक्ष स्थापन केले आहेत. जिल्हास्तरीय खर्च सनियंत्रण कक्षात नोडल अधिकारी म्हणून जि. प.चे कॅफो राजेंद्र नागणे तर सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून लेखाधिकारी सतीश दोडके, लेखाधिकारी अभिजित इटोलीकर यांची नियुक्ती केली आहे. नोडल अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी कक्षात सहाय्यक लेखाधिकारी सुरेंद्र सुरवसे, श्याम बडोदे, व्यंकटेश कुलकर्णी, मनोज येरोळे व श्रीप्रसाद बुरसे यांची नेमणूक केली आहे. जि. प., पं. स. निवडणूक प्रचारार्थ होणाऱ्या खर्चासंदर्भात काही प्रश्न उद्भवल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अथवा जिल्हा खर्च संनियंत्रण कक्षात संपर्क साधण्याचे आवाहन नोडल अधिकारी राजेंद्र नागणे यांनी केले आहे.

## दयानंद महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांचे श्रमदान; ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेची जनजागृती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लातूर तालुक्यातील चिंचोली राव येथे विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबिर सध्या उत्साहात सुरू आहे. या शिबिराअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावामध्ये व्यापक स्वरूपाचे स्वच्छता अभियान राबवून संपूर्ण गाव स्वच्छ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.



शिबिरादरम्यान स्वयंसेवकांनी रस्ते, गटारे, सार्वजनिक ठिकाणे, मंदिर परिसर व ग्रामपंचायत परिसराची स्वच्छता केली. कचरा संकलन, प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट तसेच ओल्या व सुका कचरा व्यवस्थापनाबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी स्वच्छ गाव, सुंदर गाव हा संदेश देत स्वच्छतेचे आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व ग्रामस्थांना समजावून सांगण्यात आले. सदर राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबिर दिनांक १७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न होत असून दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत स्वयंसेवकांकडून श्रमदान केले जात आहे. स्वच्छता अभियानासोबतच स्वच्छता जनजागृती रॅली, झाडांचा वाढदिवस साजरा करणे, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक प्रबोधन असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाला चिंचोली राव गावातील ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वयंसेवकांच्या कार्यात सहभाग नोंदविला. राष्ट्रीय सेवा योजना ही मी नाही, आम्ही या ब्रीदवाक्याची प्रचिती देत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी ठरत असल्याचे चित्र या शिबिरातून स्पष्टपणे दिसून येत आहे. या स्वच्छता अभियानसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, सह-कार्यक्रमाधिकारी प्रा. योगेश शर्मा, कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. निलेश मंत्री, प्रा. विशाल चव्हाण, डॉ. प्रिया वर्मा, प्रा. निकिता अग्रवाल, प्रा. मेरवान राठोड, प्रा. अक्षय राजुरवार, प्रा. कल्पना टप्पेकर, प्रा. सोनाली सास्तूरकर, प्रा. सुहास क्षीरसागर, विद्यार्थी प्रतिनिधी राहुल कुलकर्णी, सायली शेळके, गणेश सर्जे, अपूर्वा कदम आदींनी परिश्रम घेतले.

## निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाची स्थापना


**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** जि. प., पं. स. निवडणुकीत उमेदवार व राजकीय पक्षांचा होणारा खर्च मर्यादेत होण्याची कार्यवाही करण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हास्तरीय निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सुद्धा संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अधिनस्थ निवडणूक खर्च कक्ष स्थापन केले आहेत. जिल्हास्तरीय खर्च सनियंत्रण कक्षात नोडल अधिकारी म्हणून जि. प.चे कॅफो राजेंद्र नागणे तर सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून लेखाधिकारी सतीश दोडके, लेखाधिकारी अभिजित इटोलीकर यांची नियुक्ती केली आहे. नोडल अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी कक्षात सहाय्यक लेखाधिकारी सुरेंद्र सुरवसे, श्याम बडोदे, व्यंकटेश कुलकर्णी, मनोज येरोळे व श्रीप्रसाद बुरसे यांची नेमणूक केली आहे. जि. प., पं. स. निवडणूक प्रचारार्थ होणाऱ्या खर्चासंदर्भात काही प्रश्न उद्भवल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अथवा जिल्हा खर्च संनियंत्रण कक्षात संपर्क साधण्याचे आवाहन नोडल अधिकारी राजेंद्र नागणे यांनी केले आहे.


## तळागाळातील समाजासाठी ॲड. गोमारे यांचे योगदान उल्लेखनीय : बी.बी. ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** कर्मयोगी ॲड. मनोहरराव गोमारे यांनी तळागाळातील समाजासाठी आयुष्यभर निष्ठेने कार्य केले. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असून ते विचारांची धगधगती मशाल होते. समाजाला योग्य दिशा देण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले, असे प्रतिपादन बी. बी. ठोंबरे यांनी केले.



लातूर एज्युकेशन सोसायटी, लातूर यांच्या वतीने आयोजित ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या जयंतीनिमित्त व वार्षिक स्नेहसंमेलन तसेच बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ सदस्य प्रा. नागनाथराव कनामे होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, सचिव डी. एन. शेळके, उपाध्यक्ष प्रल्हादराव दुडीले, संचालक प्रा. प्रकाशराव शिंगडे, नाथराव कोले, हरिभाऊ येरमे, चंदूलाल बलदवा, प्राचार्य संजय मलवाडे, उपप्राचार्य माधव क्षीरसागर, पर्यवेक्षक हणमंत बैनगिरे, संजय कासले, मुख्याध्यापक उत्तमराव केसाळे, मुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. साबदे आदी मान्यवर उपस्थित होते. ठोंबरे यांनी ॲड. गोमारे यांच्या सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख करताना सांगितले की, त्यांनी सामाजिक न्यायासाठी सातत्याने लढा दिला. त्यांचे कार्य सर्वांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहणार आहे. यावेळी प्रा. नागनाथराव कनामे, विक्रम गोजमगुंडे व डी. एन. शेळके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात दिनदर्शिका, विज्ञान प्रयोगवही व टी-शर्टचे विमोचन करण्यात आले. कु. स्नेहा कारभारी या विद्यार्थिनीला 'ज्ञानेश्वर भूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नळदुर्ग येथील 'आपलं घर' या संस्थेस १ लाख १८ हजार ५०० रुपयांची देणगी दिली. यावेळी विविध गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य संजय मलवाडे यांनी केले. सूत्रसंचालन विश्वनाथ खंदाडे यांनी केले. आभार उपप्राचार्य माधवराव क्षीरसागर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख माया अनिगुंठे यांनी विशेष पुढाकार घेतला. यावेळी विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरूवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या माध्यमातून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.

राज्य शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित तथा प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडीओ व्हिज्युअल डिसप्ले), ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे आदींचा समावेश होतो.

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती स्थापण्यात आली आहे. समितीत पोलिस अधीक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी, अपर जिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार हे सदस्य, तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव आहेत.

प्रस्तावित जाहिरात प्रसारित तथा प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करावा लागेल. पूर्व प्रमाणनाच्या अर्जासमवेत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेसोबत दिलेला आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६: लातूर तहसील कार्यालयात उमेदवारांच्या मदतीसाठी कक्ष स्थापन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने लातूर तालुक्यातील निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी निवडणूक संबंधित नोडल अधिकारी यांची बैठक घेतली. या बैठकीत नामनिर्देशन पत्र स्वीकारणी, माघार, आचारसंहिता अंमलबजावणी, पथके स्थापना आदी बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासाठी दोनच दिवस शिल्लक असून नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींसाठी मदत कक्ष स्थापन करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. लातूर तालुक्यातील सर्व उमेदवारांनी वेळेत नामनिर्देशन पत्र सादर करावे व आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती नऱ्हे-विरोळे यांनी केले.



बैठकीस सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी श्याम गोडभरले, नायब तहसीलदार गणेश सरोदे, नायब तहसीलदार सुधीर देशमुख तसेच तहसील कार्यालय व निवडणूक नियुक्त अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेली निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याची प्रक्रिया २१ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी ११ ते ३ या कालावधीत चालणार आहे. नामनिर्देशन पत्र माघार घेण्याचा कालावधी २३ ते २७ जानेवारी २०२६ पर्यंत असून, वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ राहील. मात्र, २५ व २६ जानेवारी रोजी सुट्ट्या असल्याने त्या दिवशी माघार प्रक्रिया होणार नाही.

१९ जानेवारी २०२६ पर्यंत १३२ व्यक्तींनी १८३ फॉर्म खरेदी केले आहेत. नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यास दोनच दिवसांचा कालावधी शिल्लक असून नामनिर्देशन पत्रांच्या प्राथमिक तपासणीसाठी तहसील कार्यालयात १० पथके स्थापन करण्यात आली असून, उमेदवारांना आवश्यक मदत पुरविण्यासाठी मदत कक्ष देखील उभारण्यात आला आहे. उमेदवारांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली असून, त्यांना फॉर्म भरण्यात मदत मिळेल.

आचारसंहिता अंमलबजावणीसाठी विविध पथके कार्यरत आहेत. यामध्ये स्थिर पथके पेठ, ममदापूर, मुरुड व महापूर या ठिकाणी कार्यान्वित राहतील. तसेच भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांचे प्रमुख म्हणून गट विकास अधिकारी श्याम गोडभरले काम पाहतील. लातूर तालुक्यातील उमेदवारांना विविध परवाने देण्यासाठी लातूर पंचायत समिती कार्यालयात एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आला असून, उमेदवारांना आवश्यक परवाने (वाहन, बॅनर इत्यादी) येथून उपलब्ध करून दिले जातील. या कक्षाचे प्रमुख तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड राहतील. निवडणूक कामांसाठी मनुष्यबळ व्यवस्थापन कक्ष, खर्च पथक, मतदान जनजागृती कक्ष इत्यादी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

## जि. प., पं. स. निवडणुकीसाठी तयार रहा : दिलीपराव देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** नुकत्याच झालेल्या लातूर महापालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आ. अमीत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली घवघवीत यश मिळवले आहे. आता कार्यकर्ते - पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत नेत्रदीपक यश मिळवण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले.मनपा निवडणुकीतील नेत्रदीपक विजयाबद्दल माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके व शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अँड. किरण जाधव यांचा शाल, श्रीफळ देऊन सोमवारी सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.



आपल्या मार्गदर्शनात दिलीपराव देशमुख पुढे म्हणाले की, लातूर शहराला विकासाचे मॉडेल तयार करण्यासाठी मतदारांनी आ. अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला जनाधार दिलेला आहे. काँग्रेसने जी निवडणुकीत आश्र्वासने जाहीरनाम्यात दिलेली आहेत, ते पूर्ण करण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी करू या. जिल्हा परीषद, पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारात सर्व काँग्रेस पदाधिकारी - कार्यकर्ते यांनी दक्ष राहून

सर्वांनी एकजुटीने प्रचार करा. काँग्रेसचा झेंडा जिल्हा परिषदेवर फडकेल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा, असे आवाहनही त्यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### टाटा मोटर्सकडून १७ नेक्स्ट-जनरेशन ट्रक्स लाँच

**छत्रपती संभाजीनगर –** भारतातील ट्रकिंग क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक व गतीशीलता सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आज आपल्या १७ ट्रक्सचा नेक्स्ट-जनरेशन पोर्टफोलिओ लाँच केला. हे ट्रक्स ७ टन ते ५५ टन कन्फिग्युरेशन्समध्ये उपलब्ध आहेत. यासह सुरक्षितता, नफा व प्रगतीमध्ये नवीन मापदंड स्थापित केले आहे. या सर्वसमावेशक लाँचमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, अत्याधुनिक टाटा ट्रक्स.ईवी श्रेणी आणि प्रस्थापित प्राइमा, सिग्रा व अल्ट्रा प्लॅटफॉर्म्समधील मोठ्या अपग्रेड्सचा समावेश आहे. जागतिक सुरक्षितता मानकांचे ( ईसीई आर२९ ०३) काटेकोरपणे पालन करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे ट्रक्स उत्पन्न क्षमता वाढवतात, एकूण मालकीहक्क खर्च कमी करतात आणि वेईकल अपटाइम वाढवतात, ज्यामुळे वाहतूकदारांना मोठे यश मिळते.

### गोदरेज ॲग्रोव्हेटची महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना सोबत भागीदारी

**छत्रपती संभाजीनगर –** अग्रगण्य कृषी-व्यवसाय कंपनी असलेल्या गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडने (गोदरेज ॲग्रोव्हेट) ग्रामीण शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम-उमेद) सोबत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केल्याची घोषणा आज केली. २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' (आयवायडब्ल्यूएफ २०२६) म्हणून साजरे करण्याच्या संयुक्त राष्ट्राच्या घोषणेशी हे सहकार्य सुसंगत आहे. या अंतर्गत कृषी-अन्न प्रणालीमध्ये महिलांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकते आणि लैंगिक समानता दूर करण्यासाठी व उपजीविका मजबूत करण्यासाठी कृती करण्याचे आवाहन करते. तीन वर्षांच्या या भागीदारीचा उद्देश स्वयंसहायता गट (एसएचजी) आणि महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे, शेतीची उत्पादकता सुधारणे आणि लवचिक उपजीविका निर्माण करणे हा आहे.

### नेक्स्ट-जनरेशन शाश्वत क्लीन एनर्जी प्लॅटफॉर्म म्हणून एलएनके एनर्जी लाँच

**छत्रपती संभाजीनगर :** एलएनके एनर्जी या नेक्स्ट-जनरेशन एकात्मिक क्लीन एनर्जी प्लॅटफॉर्मने आज आपल्या लाँचची घोषणा केली. हा प्लॅटफॉर्म पुढील पाच वर्षांसाठी १०,००० कोटी रूपयांची गुंतवणूक करणार आहे. या प्लॅटफॉर्मला प्रदीर्घ उद्योजकता अनुभव आणि दीर्घकालीन भांडवल दृष्टिकोनाचे पाठबळ आहे. एलएनके एनर्जीच्या कार्यसंचालन क्षेत्रांमध्ये प्रगत उत्पादन, हरित इंधन आणि नवीकरणीय ऊर्जा निर्मितीचा समावेश आहे. कंपनीने आपला पहिला प्रकल्प ६ गिगावॅट सोलर सेल, मॉड्युलसह एकात्मिक इनगॉट व वेफर उत्पादन प्लांटची देखील घोषणा केली. हा प्रकल्प महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगर येथे ६० एकरहून अधिक जागेवर उभारण्यात येणार आहे.

### १.८ किलोचा गर्भाशयातील फायब्रॉइडची गाठ काढण्यात यश

**पुणे :** मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील डॉक्टरांनी मुंबईतील ४५ वर्षीय महिलेवर अतिशय गुंतागुंतीची टोटल लॅप्रोस्कोपिक हिस्टरेक्टॉमी यशस्वीरीत्या केली. रुग्णाला तीव्र पोटदुखी, अतिप्रमाणात मासिक पाळीतील रक्तस्राव तसेच लघवी करताना त्रास होत होता. ही सर्व लक्षणे गर्भाशयातील प्रचंड आकाराच्या फायब्रॉइडमुळे निर्माण झाली होती. दोन अपत्यांची आई असलेल्या या रुग्णेच्या दोन्ही प्रसूती सिझेरियन पद्धतीने झाल्या होत्या. सुमारे दोन वर्षांपूर्वी तिच्या गर्भाशयात फायब्रॉइड असल्याचे निदान झाले होते.

### माझ्याबहिणींकडून मला प्रेरणा मिळाली: इकबाल खान

**छत्रपती संभाजीनगर –** सोनीसबवर लवकरच 'हुई गुम यादें – एक डॉक्टर, दो जिंदगियां' ही मालिका सुरू होत आहे, ज्यामध्ये एका डॉक्टरची हृद्य कहाणी सांगितली आहे. या डॉक्टरची स्मृतीगेल्यामुळे त्याचे आयुष्य बदलले आहे. आणि या प्रक्रियेत आपल्या रुग्णांकडेबघण्याची त्याची दृष्टी केवळ वैद्यकीय न राहता अधिक माणुसकी आणि करुणा त्याच्यातआली आहे.

# 'एलएनके एनर्जी' छत्रपती संभाजीनगरात दहा हजार कोटींची गुंतवणूक करणार

## सुमारे ६० एकर क्षेत्रात उभारणार ६ गिगावॅट सोलर प्रकल्प

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० जानेवारी :** नेक्स्ट-जनरेशन एकात्मिक शाश्वत क्लीन एनर्जी प्लॅटफॉर्म 'एलएनके एनर्जी'ने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. पुढील पाच वर्षांत कंपनीकडून सुमारे १०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून या अंतर्गत सुमारे ६० एकर क्षेत्रात ६ गिगावॅट क्षमतेचा सोलर सेल व मॉड्यूल उत्पादन प्रकल्प तसेच एकात्मिक इनगॉट व वेफर प्लांट उभारण्यात येणार आहे.



या प्रकल्पासाठी एलएनके एनर्जीने महाराष्ट्र शासनासोबत सामंजस्य करार (एमओयू) केला असून, प्रगत तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या उत्पादन पद्धतींचा वापर करून उच्च-कार्यक्षमतेचे सोलर सेल्स आणि मॉड्यूल्स तयार करण्यात येणार आहेत. या प्रकल्पामुळे राज्यातील औद्योगिक विकासाला चालना मिळण्यासोबतच मोठ्या प्रमाणावर थेट व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे.

एलएनके एनर्जीची स्थापना पारितोष लधानी, डॉ. कुशाग्र नंदन आणि वरूण कराड यांनी संयुक्तपणे केली आहे. कंपनीचे कार्यक्षेत्र प्रगत उत्पादन, हरित इंधन आणि नवीकरणीय ऊर्जा निर्मिती असे बहुआयामी असून ऊर्जा प्रणालीतील सर्व स्तरांवर एकात्मिक धोरण राबवण्यावर भर दिला जाणार आहे.

उत्पादन प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर कंपनी हरित इंधन क्षेत्रात, विशेषतः ग्रीन हायड्रोजनवर लक्ष केंद्रित करणार आहे. तसेच इंडिपेंडंट पॉवर प्रोड्युसर (खझझ) म्हणून सोलर, ऊर्जा साठवणूक आणि इतर नवीकरणीय स्रोतांचा समावेश असलेले हायब्रिड ओपन ॲक्सेस सोल्यूशन्स विकसित करण्यात येणार आहेत.

दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षितता, औद्योगिक आत्मनिर्भरता आणि डिकार्बनायझेशन या राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एलएनके एनर्जीचा हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत कंपनीच्या संस्थापकांनी व्यक्त केले.

## सर्वाइकल हेल्थ: जागरूकता, प्रतिबंध आणि लवकर निदानाचे महत्त्व

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर दि. २० जानेवारी :** सर्वाइकल जागरूकता पर महिन्यात डॉ चंद्रशेखर चव्हाण, डॉ जानकीदेवी बोराडे, डॉ अनुप तोषनिवाल सांगतात सर्वाइकल हेल्थ हा महिलांच्या एकूण आरोग्याचा एक महत्त्वाचा परंतु अनेकदा दुर्लक्षित केलेला पैलू आहे. गर्भाशयाच्या खालच्या भागाला योनीशी जोडणारा गर्भाशय ग्रीवा, प्रजनन आरोग्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. संसर्ग, गुंतागुंत आणि गर्भाशय ग्रीवाच्या कर्करोगासारखे गंभीर आजार टाळण्यासाठी सर्विक्सचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. योग्य जागरूकता, नियमित तपासणी आणि वेळेवर वैद्यकीय सेवा देऊन, बहुतेक सर्वाइकल हेल्थ च्या आरोग्य समस्या टाळता येतात आणि त्यावर उपचार करता येतात.सर्वाइकल हेल्थ म्हणजे सर्विक्स चे आरोग्य सुनिश्चित करणे आणि त्यावर परिणाम करणाऱ्या असामान्यता लवकर ओळखणे. सामान्य सर्वाइकल समस्यामध्ये संक्रमण, जळजळ, कर्करोगापूर्वीचे बदल आणि सर्वाइकल समस्याचा कर्करोग यांचा समावेश आहे. यापैकी अनेक समस्या हळूहळू विकसित होतात आणि सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही लक्षणे दिसू शकत नाहीत, म्हणून नियमित तपासणी अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वाइकल कैंसर हा कर्करोगाच्या सर्वात प्रतिबंधात्मक प्रकारांपैकी एक आहे जर लवकर निदान झाले तर. त्याचे मुख्य कारण म्हणजे विशिष्ट प्रकारच्या मानवी पॅपिलोमाव्हायरस चा सतत संसर्ग, जो त्वचेपासून त्वचेच्या संपर्कातून पसरतो. जरी एचपीव्हीसंसर्ग अनेकदा स्वतःहून बरा होतो, परंतु दीर्घकालीन संसर्ग सर्वाइकलच्या पेशींमध्ये असामान्य बदल घडवून आणू शकतो आणि जर उपचार न केल्यास कर्करोग होऊ शकतो.

## रजत वर्माचा नवा लुक 'मोहब्बतें'च्या शाहरुख खानसारखा आहे

**तभा वृत्तसेवा**


**छत्रपती संभाजीनगर दि. २० जानेवारी :** वेधक कथानकामुळे सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिका लोकप्रिय झाली आहे. या मालिकेत विराटची भूमिका करणाऱ्या रजत वर्माने अलीकडेच आपल्या लुकमध्ये लक्षणीय बदल घडवून आणला आहे, ज्यामुळे पडद्यावरील त्याच्या व्यक्तिरेखेला एक नवा कोरा आयाम मिळाला आहे. मालिकेत सुरुवातीला साध्या कॅज्यूअल्समध्ये बिनधास्त वाटणारा विराट आता नव्या लुकमध्ये अधिक परिपक्व आणि मर्दानी दिसत आहे.

## 'हे भगवान – कितना बदल गया इन्सान!' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर दि. २० जानेवारी :** हलके-फुलके आणि निखळ मनोरंजन देण्याच्या धोरणाशी सुसंगत राहून एण्ड टीव्ही लवकरच नवी विनोदी-दैवी मालिका 'हे भगवान – कितना बदल गया इन्सान!' प्रेक्षकांच्या भेटीला आणत आहे. विनोद, भावना आणि पौराणिक ट्विस्ट यांचे प्रभावी मिश्रण असलेली ही ड्रॅमेडी मालिका संपूर्ण कुटुंबासाठी मनोरंजनाची हमी देणारी ठरणार आहे.

या मालिकेची कथा उज्जैनमधील प्रामाणिक वकील महेश शर्मा याच्याभोवती फिरते. कोणत्याही परिस्थितीत सत्य बोलण्याच्या त्याच्या स्वभावामुळे घर, न्यायालय आणि समाजात अनेक विनोदी व काहीसे विलक्षण प्रसंग निर्माण होतात. महेशच्या आयुष्यात शिवभगवान पृथ्वीवर येऊन त्याच्यासोबत राहू लागतात आणि त्यातून एक हृदयस्पर्शी तसेच हास्यप्रधान प्रवास सुरू होतो.




या प्रवासातून दयाळूपणा, प्रामाणिकपणा आणि समजूतदारपणाचा सकारात्मक संदेश दिला जातो.

'हे भगवान – कितना बदल गया इन्सान!' ही मालिका लवकरच एण्ड टीव्हीवर प्रसारित होणार असून, हिंदी झी५वर स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध असेल.

## स्केचिंगपासून गाण्यांपर्यंत – 'वसुधा'च्या सेटवर प्रिया ठाकूर शोधते आराम आणि एकाग्रता

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० जानेवारी :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'वसुधा' मध्ये वसुधाची भूमिका साकारणारी अभिनेत्री प्रिया ठाकूरने आपल्या मेकअप रूमला वैयक्तिक सुरक्षित कोपऱ्याचे स्वरूप दिले आहे. शूटिंगदरम्यान दीर्घ वेळ सेटवर घालवत असल्याने ही जागा तिच्यासाठी आराम आणि सकारात्मकतेचा स्रोत ठरते.

प्रियाने आपल्या मेकअप रूमची सजावट स्वतः केली असून, तिच्या हाताने काढलेली स्केचेस, प्रेरणादायी पोस्टर्स आणि फेरी लाईट्समुळे खोलीत शांत आणि ऊबदार वातावरण निर्माण झाले आहे. कबुतरांच्या रेखाटनांद्वारे शांततेचे प्रतीक तिने या जागेत आणले आहे. या आकर्षक माहोलामुळे सहकलाकार आणि मित्रमंडळीही शूटिंगच्या विश्रांतीत येथे वेळ घालवायला पसंत करतात.

प्रिया सांगते की हीच खोली तिच्या भावनिक तयारीसाठी महत्त्वाची आहे. सीननुसार ती संगीत ऐकते, डायलॉग्सचा सराव करते आणि भूमिकेत पूर्णपणे शिरण्यासाठी याच जागेचा उपयोग करते.

ऑनस्क्रीन वसुधाच्या भूमिकेप्रमाणेच, वास्तविक आयुष्यातही प्रिया आपल्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि भावनिक खोलीचे दर्शन घडवते.

'वसुधा' मालिका दररोज रात्री ९:३० वाजता फक्त झी टीव्हीवर प्रसारित होते.

## मराठी सिनेमे बनवण्यापेक्षा ते प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवणे अधिक महत्त्वाचे – दिग्दर्शक केदार शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० जानेवारी :** सध्या मराठी चित्रपटांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत असली, तरी हे चित्रपट अपेक्षित प्रमाणात प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नसल्याचे चित्र दिसत आहे. दरी भरून काढण्यासाठी केवळ अधिक चित्रपट बनवण्यावर भर न देता, ते जास्तीत जास्त लोकांपर्यंत कसे पोहोचतील यासाठी प्रभावी वितरण व पोहोच धोरण राबवणे आवश्यक असल्याचे मत ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक केदार शिंदे यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथे त्यांच्या आगामी मराठी चित्रपट 'अगबाई सुनबाई काय म्हणता सासूबाई' यांच्या प्रमोशनच्या निमित्ताने आयोजित पत्रकार संवादात ते बोलत होते.

चित्रपटाविषयी माहिती देताना शिंदे म्हणाले की, 'अगबाई सुनबाई काय म्हणता सासूबाई' हा चित्रपट १६ जानेवारीपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला असून सध्या राज्यातील सुमारे ३७० चित्रपटगृहांमध्ये १००० हून अधिक शो सुरू आहेत. हा चित्रपट स्त्री सशक्तीकरणावर भाष्य करणारा असून कौटुंबिक नातेसंबंधांच्या सूक्ष्म भावना प्रभावीपणे मांडतो.

सासू-सुनेच्या नात्याबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, अनेक कुटुंबांमध्ये हे नाते 'तुझं माझं जमेना, तुझ्यावाचून करमेना' अशा स्वरूपाचे असते, तर काही ठिकाणी 'असून अडचण, नसून खोळंबा' अशी परिस्थिती दिसते. मात्र, या नात्याच्या पलीकडे जाऊन एक असा भावनिक बंध असतो, जो कधीच सैल होत नाही. याच भावनांचा वेध घेणारा आणि सासू-सुनेच्या नात्याचे नवे पैलू उलगडणारा हा चित्रपट आहे.



हा चित्रपट पूर्णतः मनोरंजक आणि कौटुंबिक स्वरूपाचा असून चौकोनी कुटुंबाची कथा मांडतो. त्यामुळे घरातील प्रत्येक प्रेक्षकासाठी हा चित्रपट आहे. यात विनोद, भावना आणि प्रत्येक घरात दिसणाऱ्या सासू-सुनेच्या नात्यातील ओळखीची परिस्थिती प्रभावीपणे सादर करण्यात आली आहे. प्रेक्षकांना या नात्यातील गंमतीदार प्रसंग, भावनिक वळणे आणि दोन्ही व्यक्तिरेखांची ताकद अनुभवता येईल, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी अभिनेत्री निर्मिती सावंत आणि प्रार्थना बहिरे उपस्थित होत्या.

या चित्रपटाचे दिग्दर्शन केदार शिंदे यांनी केले असून सना शिंदे आणि उमेश कुमार बन्सल हे निर्माते आहेत. चित्रपटाची कथा व संवाद वैशाली नाईक आणि ओमकार मंगेश दत्त यांचे असून पटकथा वैशाली नाईक यांनी लिहिली आहे. छायाचित्रण आणि संकलन मयूर हरदास यांनी केले आहे.

अधिकाधिक प्रेक्षकांनी 'अगबाई सुनबाई काय म्हणता सासूबाई' हा चित्रपट आवर्जून पाहावा, असे आवाहन दिग्दर्शक केदार शिंदे यांनी यावेळी केले.

# संसाधनांचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करणे गरजेचे : ऑलिव्हर ब्लम

## एमजीएममध्ये एन्ड्रेस अँड हाऊसर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० जानेवारी :** व्यवसायामध्ये मूल्य जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. आज संसाधने मर्यादित असल्याने त्यांचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. पर्यावरण संरक्षणाबाबत आम्ही कटिबद्ध असून शाश्वत विकासाच्या तत्त्वांवर आधारित कामकाजावर आमचा भर असतो, असे प्रतिपादन एन्ड्रेस अँड हाऊसर इन्फोसर्व्ह कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक ऑलिव्हर ब्लम यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डिपार्टमेंटच्या वतीने आज विद्यार्थ्यांसाठी एन्ड्रेस अँड हाऊसर इन्फोसर्व्ह कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संवाद सत्राचे आयोजन रुक्मिणी सभागृहात करण्यात आले होते. यावेळी, एन्ड्रेस अँड हाऊसर इन्फोसर्व्ह कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक ऑलिव्हर ब्लम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, एन्ड्रेस अँड हाऊसर इन्फोसर्व्ह कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालिका कविता राज, बिझनेस अप्लिकेशन्स प्रमुख मनोज पाटील, डेव्हलपमेंट प्रमुख रूतुजा राजगुरू, टेक्निकल प्रमुख अजित सिनारे, अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे, सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रमुख डॉ.परमिंदर कौर, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ऑलिव्हर ब्लम म्हणाले, एन्ड्रेस अँड हाऊसर १२५ देशांमध्ये कार्यरत असून ११ देशांतील ३६ उत्पादन केंद्रांमधून कंपनी आपले काम करीत आहे. सध्या कंपनीमध्ये सुमारे १७ हजार पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. टीमवर्कच्या माध्यमातून सातत्याने सुधारणा साधण्यावर कंपनीचा भर असून कमिटमेंट, एक्सलन्स, सस्टेनेबिलिटी आणि फ्रेंडलीनेस ही मूल्ये जोपासत कंपनी जागतिक पातळीवर कार्य करत आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून कृत्रिम बुद्धिमत्ता क्षमताही वेगाने विकसित होत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारच्या संवाद सत्रांचे आयोजन एमजीएम विद्यापीठाच्या वतीने नियमितपणे केले जाते. उद्योग आणि शिक्षण क्षेत्र एकत्र आल्यामुळे विद्यार्थ्यांना अनुभवाधारित व कौशल्याधिष्ठित शिक्षणाची संधी मिळत असून याचा त्यांच्या जडणघडणीत मोठा फायदा होत आहे. येत्या काळात एन्ड्रेस अँड हाऊसर कंपनीच्या सहकार्याने विद्यापीठामार्फत अशा आणखी उपक्रमांची आयोजन करण्यात येईल, असे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी सांगितले.

आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलणात कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर म्हणाले की, एमजीएम विद्यापीठ हे शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीचे कार्य सातत्याने करीत आहे. एन्ड्रेस अँड हाऊसर यांच्या सहकार्याने २०२१ मध्ये एमजीएम विद्यापीठात अत्याधुनिक प्रयोगशाळा सुरू करण्यात आली असून विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला आजचा हा संवाद नव्या ज्ञानासह करिअरच्या संधी खुल्या करणारा ठरणार आहे.

एन्ड्रेस अँड हाऊसर इंडिया ऑटोमेशन ही जागतिक पातळीवर ऑटोमेशन क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून १९५३ मध्ये तिची स्थापना झाली आहे. महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर आणि मुंबई येथून कंपनीचे केंद्र कार्यरत आहे. आयुष्यात मोठ्या पदांपर्यंत पोहोचायचे असेल तर मेहनत, सातत्य आणि आपण ज्या संस्थेमध्ये कार्यरत आहोत त्या संस्थेसाठी आपले सर्वोत्तम देण्याची वृत्ती आवश्यक आहे. आपल्या कामाबद्दल आवड जपून प्रामाणिकपणे काम करत राहिल्यास यश निश्चित मिळते, असे कविता राज यांनी यावेळी बोलताना सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिमरन कौर यांनी केले तर आभार सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रमुख डॉ. परमिंदर कौर यांनी मानले.

## यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक– कुंडलिकराव अतकरे

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० जानेवारी :** जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक असुन शासकीय विभागीय ग्रंथालयातील ग्रंथांचे दालन सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मराठी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त शहरातील समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचे कार्यक्रमप्रसंगी उदघाटक म्हणून अतकरे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह श्री गुलाबराव मगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री सुभाष साबळे, देवगिरी



कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वनिता निकम,जीवन कुलकर्णी व देवगिरी हायस्कूलचे शिक्षक श्री कोलते हे उपस्थित होते.

मातृभाषेचा संस्कार व्यक्तीच्या अंतःकरणात खोलवर रुजलेला असतो. आनंद व दुःखासारख्या तीव्र भावना अनुभवताना मुखातून बाहेर पडलेले उद्गार हे मातृभाषेतीलच असतात.मराठी शब्दसाठा वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील ग्रंथांचे वाचन करण्याचे आवाहन सुनील हुसे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री संतोष जाधव यांनी केले.

तर सुत्र संचालन व आभार प्रदर्शन तांत्रिक सहाय्यक गोविंद खेडकर यांनी मानले.

कार्यक्रमास शिक्षकवृंद व विद्यार्थी, विभागीय ग्रंथालयाचे सभासद,वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाअखेर उपस्थित विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथ वाचन केले.

सदर ग्रंथप्रदर्शन दि.२८ तारखे पर्यंत सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या ग्रंथप्रदर्शनाला भेट द्यावी व शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सभासद होऊन येथील वाचन सुविधेचा लाभ घेण्याविषयी आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री संतोष जाधव यांनी केले आहे.

## अग्रलेख...

# 'देवा'स आठवावे

जवळपास तीन आठवड्यांपूर्वी एका पत्रकार परिषदेत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना यांचा संयुक्त वचननामा जाहीर करताना घडलेला एक किस्सा वारंवार आठवावा अशा सुसंगत घटनांचा क्रम त्यानंतर सुरू झाला. राज आणि उद्धव ठाकरे हे पुरोगामी पक्षांच्या वळचणीस जाण्यासाठी प्रयत्न करत असले तरी त्यांची मूळ मानसिकता सश्रद्ध अशीच आहे यात शंका नाही. कधी त्यांनी, राजकीय हितसंबंध जपण्यासाठी व मतांच्या अपेक्षेने हिंदुत्वाचा मुद्दा खुंटीवर ठेवण्याचीही तयारी केली, त्या अपेक्षेसाठी ते देवदेवतांबाबतच्या हिंदूंच्या भावनांवर प्रहार करतही असतात, पण कसोटीच्या क्षणी त्यांनाही देवाचीच आठवण होते, हा केवळ योगायोग नाही. म्हणूनच, त्या पत्रकार परिषदेत जेव्हा भाजपाचे नेते रावसाहेब दानवे यांच्या एका आरोपाचा उल्लेख करून पत्रकारांनी ठाकरे बंधूंना प्रश्न विचारला, तेव्हा उद्धव ठाकरे यांनी केवळ दानवे यांची खिल्ली उडवून प्रश्न टोलविण्याचा प्रयत्न केला. पुढे दानवे यांनी त्याचा चांगलाच समाचार घेतला ही बाब निराळी, पण त्या प्रश्नावरील उद्धव ठाकरे यांच्या उत्तरानंतर माईक हातात घेऊन राज ठाकरे यांनी व्यक्त केलेले स्वतःचे मत मात्र, खूप काही बोलके ठरले. 'कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देवाला द्यावीत, दानवाला नव्हे', असे ते म्हणाले, तेव्हा त्यावर पत्रकारांमध्ये तात्पुरती खसखस पिकली, पण राज ठाकरे कोणत्या देवाला उत्तर देऊ इच्छितात, याचीही चर्चा सुरू झाली. त्याच दरम्यान शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत आणि सिनेनिर्माते महेश मांजरेकर यांनी घेतलेल्या राज व उद्धव ठाकरे यांच्या मुलाखतीतही राज ठाकरे यांना पडलेला प्रश्नदेखील पुढील घटनांचा संकेत देणारा ठरला. त्या मुलाखतीत एका प्रसंगापुरते व्यथित झालेले राज ठाकरे यांच्या मनात त्या वेळी देवाच्या अस्तित्वाविषयी संभ्रम निर्माण झाला होता. सध्याचे राजकारण पाहता देवाचे अस्तित्व आहे असे वाटत नाही, असे काही मत त्यांनी व्यक्त केले. या दोघा भावांच्या मनात उद्भवणाऱ्या देवाच्या अस्तित्वाविषयीच्या शंका त्या त्या प्रसंगानुरूप उफाळून येतात, असे समोर येणाऱ्या परिस्थितीनुसार दिसते. कारण, त्याआधीही काही वेळा असेच घडले होते. भाजपासोबतची दीर्घकाळापासून युती सोडून काडीमोड घेतल्यानंतर महाविकास आघाडीत सामील होताना उद्धव ठाकरेंनी 'शेंडी जानव्याचे हिंदुत्व' म्हणत हिंदूंच्या भावनांची खिल्ली उडविली तेव्हा कदाचित त्यांना हिंदूंच्या भावविश्वात देवाच्या अस्तित्वाचे महत्त्व किती आहे याचा तात्पुरता विसर पडलादेखील असेल, पण पुढे मुख्यमंत्रिपदाच्या काळात कोविडचा कहर माजल्यावर एका क्षणी मनात निर्माण झालेल्या हतबलतेच्या भावनेतून त्यांनाही देवाचीच आठवण झाली होती. महामारीचा कहर आणि आसपास माजलेले मृत्युभयाचे थैमान पाहून व्यथित झालेल्या उद्धव ठाकरे यांनी, 'आता आपापल्या देवाचा धावा करा' असा अगतिक सल्ला जनतेला दिला होता, हे अनेकांस आठवतही आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांचा देवावर विश्वास आहे हे वेळोवेळी दिसूनही आले आहे. त्यांचा परिवारही देवावरच विश्वास ठेवतो, हेदेखील अनेकदा स्पष्ट झाले आहे. कुरुक्षेत्रावरील महायुद्धाच्या प्रसंगी रणांगणावर समोर उभ्या असलेल्या आप्तांना पाहून संभ्रमित झालेल्या अर्जुनाच्या त्या वेळच्या मानसिक अवस्थेची आठवण यावी, असाच संभ्रम देवाच्या अस्तित्वाविषयी राज ठाकरेंच्या मनात माजला असावा. देवदेवता आहेत की नाही असा प्रश्नदेखील राज ठाकरे यांना त्याच व्यथित मनःस्थितीतून पडला असावा. पण ज्यांची देवावर श्रद्धा असते, त्यांना अशा संभ्रमातून बाहेर काढण्याचे कामदेखील देवालाच करावे लागते. राज ठाकरे यांना देवाच्या अस्तित्वासंदर्भात शंका निर्माण होत होती, तेव्हाच त्यांच्या पत्नी मात्र, हातात जपमाळ घेऊन त्यांच्या पक्षाच्या उमेदवारासाठी मते मागत होत्या, याची नोंद जनतेने घेतली होती.

त्या मुलाखतीत राज ठाकरे यांना आणखी एक प्रश्न पडला होता. देवाचे अस्तित्व असेलच तर सध्याच्या राजकारणात तो गप्प राहून बघत का बसला आहे, असा प्रश्न त्यांनी विचारला होता. पण भक्तांसोबत वागण्याची देवाची रीत वेगळीच असते. भक्तांना पाहिजे तेव्हा देवाचा प्रतिसाद मिळत नसतो, तर देवाच्या मनात असेल तेव्हाच भक्ताला त्याच्या प्रश्नांची उत्तरे मिळून जातात, यावर सश्रद्ध हिंदूंचा विश्वास असतो. देवाच्या अस्तित्वाविषयी शंका व्यक्त करणारी ती मुलाखत पूर्ण झाल्यानंतर काही काळातच राज व उद्धव ठाकरे आपल्या परिवारासह देवाच्या दर्शनासाठी बाहेर पडले, तेव्हा त्यांच्या मनातील देवाविषयीच्या शंका संपल्या असाव्यात याची खात्री समाजमाध्यमावरील अनेकांस पटली. हा प्रश्न विचारून राज आणि उद्धव ठाकरे यांनी कुटुंबीयांसह मुंबादेवीचे दर्शन घेतल्याची छायाचित्रे आणि बातम्या झपाट्याने माध्यमांत झळकल्या आणि देवाचे दर्शन घेणे हा हिंदू परंपरेचाच एक भाग असल्याच्या जाणिवेने सश्रद्ध समाजात समाधान पसरले. राज ठाकरे यांचा देवावर विश्वासच आहे याची खात्री देणारे अनेक प्रसंग याआधी घडले आहेत. तीन वर्षांपूर्वी, फेब्रुवारी २०२३ मध्ये पनवेल येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राजभाषा संमेलनातील एका मुलाखतीत, देवाच्या अस्तित्वाविषयी राज ठाकरे यांनी विश्वास व्यक्त केला होता. 'आपल्याकडची शहरे एवढी बकाल झाली असूनही त्यांचा कारभार सुरळीत सुरू आहे हे पाहिले की देवाच्या अस्तित्वाची खात्री पटते', असे उद्गार त्या मुलाखतीत राज ठाकरे यांनीच काढले होते.

तसे पाहिले, तर ठाकरे बंधूंचा देवावर विश्वास आहे किंवा नाही हा प्रश्न सामाजिक चर्चेचा व्हावा एवढा काही महत्त्वाचा नाही. ज्यांच्या मनात मुळातच या प्रश्नाविषयीचा संभ्रम आहे, उत्तरांच्या शोधात जे स्वतःच चाचपडत आहेत, जे स्वतःच कधी देवावर विश्वास ठेवून काम करतात आणि कधी देवाच्या अस्तित्वावरच शंका उपस्थित करतात, त्यांच्या संभ्रमित मनाचे नेमके उत्तर शोधणे अन्य कोणासही अवघडच असते. सोयीनुसार देवावर विश्वास किंवा अविश्वास दाखविणे ही राजकारणातील अपरिहार्यतादेखील असावी. म्हणूनच, हिंदूंच्या श्रद्धेचा विषय असलेल्या एखाद्या पवित्र दिवशी आग्रहाने मांसाहार करणे, मांसाहार केल्याचे कारण देत मंदिरात जाण्याची टाळाटाळ करणे अशा तात्कालिक कृतींमधून जाणीवपूर्वक प्रसिद्धी मिळविणारे अन्य काही राजकीय नेतेदेखील पाहावयास मिळतात. जनतेच्या भावनांचा लाभ घेण्याच्या राजकीय फायद्यातोट्यांची गणिते आखून, त्या त्या वेळी काही भूमिका घेणाऱ्यांच्या मनात येणारे प्रश्न हा मुळात त्यांचा संभ्रम नसतो, तर समाजास संभ्रमित करण्याचा प्रयत्न असतो. जेव्हा जी भूमिका सोयीची वाटते, तेव्हा ती घेऊन समाजाच्या भावनांवर स्वार होण्याच्या राजकारणाचा तो भाग असतो. म्हणूनच मांसाहाराचे समर्थन करणाऱ्यांनाही, त्या वेळेची गरज पाहून त्यानुसार आपल्या आस्तिकतेची खात्री पटवून देण्याकरितादेखील आटापिटा करावा लागतो. देवाच्या मनात काय आहे हे ओळखता येत नाही ही सश्रद्ध समाजाने मान्य केलेली समजूत आहे. त्यास कोणी अंधश्रद्धा म्हणतात, तर कोणास हीच खरी श्रद्धा आहे असे वाटते.

आता महापालिका निवडणुकांचे निकाल स्पष्ट झाले आहेत. महापौर निवडीबाबत राजकीय पक्ष आपापली राजकीय समीकरणे आखू लागले आहेत. उभ्या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या आणि सर्वांत मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मतदारांनी धूर्तपणाने कौल दिलेला असल्याने, महापौर निवडीच्या प्रक्रियेत राजकीय पक्षांची कसोटी सुरू झाली आहे. अशा कोणत्याही कसोटीच्या क्षणी देवाची आठवण व्हावी हादेखील सश्रद्धतेचाच पुरावा असतो. साहजिकच, उद्धव ठाकरे यांनाही देवाची आठवण झाली आहे. 'देवाच्या मनात असेल तर' असे म्हणत त्यांनी आपली राजकीय इच्छा उघड केल्याने, आता देवाकडून काय कौल दिला जातो, हे पाहण्यासाठी जनता उत्सुक झाली आहे. त्यांची ही इच्छा देवापर्यंत पोहोचलेली असावी, असे त्यानंतरच्या काही घडामोडींतून दिसू लागले आहे. मात्र, देवाच्या मनात काय आहे, हे कोणालाच कळत नाही आणि देवाच्या मनात काही असेलच, तर तेथे कोणाचेच काही चालतही नाही. ही मात्र अंधश्रद्धा नाही!

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# अमेरिका-क्युबात शत्रुत्व का?

व्हेनेझुएलामध्ये लष्करी कारवाई केल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प शांत बसलेले नाहीत. त्यांचे जगातील अनेक देशांकडे लक्ष असले, तरी दक्षिण अमेरिकेतील क्युबा त्यांच्या डोळ्यात जास्त सलतो आहे. क्युबासारख्या छोट्या देशाने अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला झुंजवत ठेवले आहे. रशिया आणि चीनशी क्युबाचा वाढत चाललेला दोस्ताना अमेरिकेला खुपतो आहे. त्यामुळे व्हेनेझुएलानंतर अमेरिकेने क्युबाकडे आपली वक्रदृष्टी वळवली आहे. इराण आणि ग्रीनलॅण्डनंतर अमेरिका क्युबाविरोधात मोहीम उघडू शकते. ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर लिहिले की, अनेक वर्षांपासून व्हेनेझुएलाकडून मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या तेल आणि पैशांवर क्युबा अवलंबून होता. त्या बदल्यात क्युबाने व्हेनेझुएलाच्या शेवटच्या दोन हुकूमशहांना 'सुरक्षा सेवा' पुरवल्या; पण आता नाही. गेल्या आठवड्यात व्हेनेझुएलावर अमेरिकेच्या हल्ल्यादरम्यान, तेथे उपस्थित असलेले बहुतेक क्युबन लोक मारले गेले. व्हेनेझुएलाला आता इतके वर्षे ओलिस ठेवणाऱ्या गुंड आणि खंडणीखोरांपासून संरक्षणाची गरज नाही, असे नमूद करून ट्रम्प यांनी लिहिले की, व्हेनेझुएलाकडे आता जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्य असलेल्या अमेरिकेकडे त्यांचे संरक्षण आहे. क्युबाला आता तेल किंवा पैसा पाठवला जाणार नाही. मी सुचवतो की त्यांनी खूप उशीर होण्यापूर्वी करार करावा. अमेरिका भारतासह अन्य देशांवर व्यापारी करार करण्यासाठी कसा दबाव आणते, याचे हे ज्वलंत उदाहरण.

पश्चिम गोलार्धातील देशांकडे अमेरिकेचे नेहमीच लक्ष राहिले आहे. या देशांमध्ये आणखी कोणताही हस्तक्षेप होऊ नये, असे अमेरिका इच्छिते. तथापि, रशिया आणि चीनशी क्युबाचे चांगले संबंध अमेरिकेला मान्य नाहीत. ट्रम्प रशियाला मोठा धोका मानत नाहीत. सध्या ते चीनला मोठा धोका मानतात. त्यांना पश्चिम गोलार्धातील चीनचा प्रभाव संपवायचा आहे. ट्रम्प हे क्युबाबाबत कठोर भूमिका घेणारे एकमेव अमेरिकन अध्यक्ष नाहीत. क्युबा आणि अमेरिकेतील स्पर्धा अनेक दशकांपासून सुरू आहे. १८९८ मध्ये अमेरिकेने स्पेनचा पराभव केला. त्यानंतर स्पेनने क्युबावरील सर्व दावे सोडून दिले आणि ते अमेरिकेने सुरू केले. १९०२ मध्ये क्युबाला स्वातंत्र्य मिळाले आणि टॉमस एस्ट्राडा पाल्मा त्याचे पहिले अध्यक्ष झाले; परंतु प्लॅट सुधारणांमुळे हा देश अमेरिकेच्या संरक्षणाखाली राहिला. त्यामुळे अमेरिकेला क्युबाच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार मिळाला. काही वर्षांनंतर एस्ट्राडा यांनी राजीनामा दिला आणि जोसे मिगुएल गोमेझ यांच्या नेतृत्वाखाली बंड झाल्यानंतर अमेरिकेने क्युबा ताब्यात घेतला. अमेरिकेच्या देखरेखीखाली क्युबामध्ये १९०९ मध्ये निवडणुका झाल्या आणि जोसे मिगुएल गोमेझ अध्यक्ष झाले; परंतु लवकरच भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये अडकले. १९१२ मध्ये वांशिक भेदभावाविरुद्ध कृष्णवर्णीय निदर्शने दडपण्यासाठी अमेरिकन सैन्य क्युबाला परतले. १९३३ मध्ये क्युबन लष्करी अधिकारी फुलगेन्सियो बतिस्ता यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडाने जेरार्डो मचाडो यांना उलथवून टाकले.

१९५३ मध्ये फिडेल कॅस्ट्रो यांनी बतिस्ता राजवटीविरुद्ध अयशस्वी बंड केले. 'कौन्सिल ऑफ फॉरेन रिलेशन्स' (सीएफआर) च्या अहवालात म्हटले आहे की अमेरिका आणि क्युबामधील शत्रुत्वाचा खोल पाया १९५९ मध्ये घातला गेला, जेव्हा फिडेल कॅस्ट्रो यांनी क्युबामधील अमेरिकासमर्थित सरकार उलथून टाकले. सुरुवातीला अमेरिकेने नवीन सरकार स्वीकारले; परंतु क्युबाने अमेरिकेचा कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या सोव्हिएत रशियाशी जवळचे संबंध निर्माण करण्यास सुरुवात करत व्यापार सुरू केला, तेव्हा अमेरिका संतप्त झाली. क्युबाने अमेरिकन कंपन्यांची मालमत्ता जप्त केली आणि अमेरिकन वस्तूंवर जास्त कर लादले. कॅस्ट्रोंच्या आगमनानंतर क्युबामध्ये समाजवादाची लाट आली, तर अमेरिका भांडवलशाही धोरणाचा अवलंब करत होती. क्युबा चीनशी चांगले संबंध विकसित करू शकेल, अशी शक्यताही होती, म्हणूनच अमेरिकेने क्युबाविरुद्ध कठोर भूमिका स्वीकारली. अमेरिकेने क्युबाला आर्थिकदृष्ट्या शिक्षा करण्यास सुरुवात केली. क्युबाकडून साखर खरेदी कमी केल्यानंतर अमेरिकेने क्युबाला जवळजवळ सर्व वस्तू पाठवणे बंद केले. अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी याचे रूपांतर 'संपूर्ण आर्थिक निर्बंध'मध्ये केले आणि कठोर प्रवास निर्बंध लादले. १९६१ मध्ये अमेरिकेने क्युबामध्ये फिडेल कॅस्ट्रोंचे सरकार उलथवून टाकण्यासाठी लष्करी कारवाई सुरू केली. तथापि, ही कारवाई अयशस्वी झाली.

'बे ऑफ पिग्ज आक्रमण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या घटनेत अमेरिकेने क्युबन बंडखोर आणि निर्वासितांविरुद्ध बळाचा वापर केला होता. त्यांनी आधीच पकडलेल्यांना लष्करी प्रशिक्षण आणि निधी पुरवला. क्युबन सरकार उलथवून टाकण्यासाठी हल्ला करण्यात आला; परंतु स्थानिक लोकसंख्येच्या पाठिंब्याअभावी अमेरिका आणि क्युबन बंडखोर अयशस्वी झाले. अमेरिकेचे हवाई समर्थन उपलब्ध नसल्याने क्युबाने अवघ्या तीन दिवसांमध्ये बंड चिरडून टाकले. त्या वेळी केनेडी यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका सत्तेत होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेची प्रतिमा खराब झाली. यानंतर क्युबाने सोव्हिएत महासंघाला त्याच्या भूभागावर गुप्तपणे अणु क्षेपणास्त्रे बसवण्याची परवानगी दिली. ऑक्टोबर १९६२ मध्ये अमेरिकन विमानांनी ही क्षेपणास्त्रे पाहिली. त्यानंतर अमेरिका आणि सोव्हिएत महासंघातील तणाव १३ दिवस टिकून राहिला. परिस्थिती अणुयुद्धाच्या जवळ आली होती. शेवटी, सोव्हिएत नेते निकिता ख्रुश्चेव्ह क्षेपणास्त्रे काढून टाकण्यास सहमत झाले. त्या बदल्यात, केनेडीने क्युबावर हल्ला न करण्याचे आणि तुर्कीमधून अमेरिकन क्षेपणास्त्रे काढून टाकण्याचे आश्वासन दिले. तथापि, दोन्ही देशांमधील तणाव कमी झाला नाही. पुढील काही दशकांपर्यंत अमेरिकेने क्युबाला आर्थिक आणि राजनैतिकदृष्ट्या वेगळे केले. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी १९८२ मध्ये क्युबाला 'दहशतवाद्यांना पाठिंबा देणारा' देश म्हणून घोषित केले. नंतर जॉर्ज बुश आणि बिल क्लिंटन यांनी हेल्म्स-बर्टन कायदा लागू केला.

बराक ओबामा यांच्या कार्यकाळात क्युबाशी अमेरिकेचे संबंध सुधारले. 'सीएफआर'च्या अहवालानुसार २००८ च्या निवडणुकीदरम्यान ओबामा म्हणाले की, क्युबाला वेगळे केल्याने काहीही चांगले झाले नाही. २०१४ मध्ये एका घटनेने संपूर्ण जगाला धक्का बसला. ओबामा आणि क्युबाचे नेते राऊल कॅस्ट्रो यांनी अचानक घोषणा केली की दोन्ही देश राजनैतिक संबंध पुन्हा स्थापित करतील. त्यानंतर क्युबाला 'दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या' देशांच्या यादीतून काढून टाकण्यात आले. २०१६ मध्ये ओबामा यांनी वैयक्तिकरीत्या क्युबाला भेट दिली. १९२८ नंतर अमेरिकेच्या अध्यक्षांचा क्युबाचा हा पहिलाच दौरा होता. २०१९ मध्ये ट्रम्प यांनी पुन्हा क्युबाला 'दहशतवाद्यांना पाठिंबा देणारा देश' घोषित केले. अमेरिकेने क्युबाची राजधानी हवाना येथून आपल्या दूतावासातील बहुतेक कर्मचाऱ्यांना माघारी बोलावले. बायडेन यांच्या काळात काही नियम शिथिल करण्यात आले. त्यानंतर २०२१ मध्ये अन्न, औषध आणि विजेच्या कमतरतेमुळे त्रस्त असलेल्या क्युबन लोकांनी निषेध करण्यास सुरुवात केली. सरकारने निदर्शकांना अटक केली आणि इंटरनेट बंद केले. बायडेन प्रशासनाने क्युबावर नवीन निर्बंध लादले. क्युबातील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत गेली. लोक मोठ्या संख्येने अमेरिकेत पळून जाऊ लागले. व्हेनेझुएलाच्या घटनेनंतर ट्रम्प यांचे कोणतेही विधान हलक्यात घेणे चुकीचे ठरेल.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# ऑनलाईन खरेदीमुळे स्थानिक उद्योग धोक्यात

ऑनलाईन खरेदीच्या मोहजालामध्ये आज प्रत्येक जण अडकत चालला आहे. ही खरेदी सहज सोपी आणि वेळेची बचत करणारी असली तरी त्याचे तोटेही तेवढेच भयंकर आहे. आजकाल विविध प्रलोभने देऊन ई-कॉमर्स कंपन्यांनी मानवी मनाचा आणि मेंदूचा ताबा घेतला आहे. त्यामुळे आम्ही जे विकतो तेच योग्य असा भ्रम या कंपन्यांनी समाजामध्ये पद्धतशीरपणे पसरविला आहे. आपल्या देशामध्ये सध्या विदेशी ई-कॉमर्स कंपन्यांचा बोलबाला असून, त्यांनी संपूर्ण भारतीय समाजमनावर ताबा मिळविला आहे. स्मार्टफोनच्या पदार्पणानंतर त्याची व्याप्ती तर अधिकच वाढली आहे. त्यामुळे या बाबीचा अतिशय गंभीरतेने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. ऑनलाईनच्या वाढत्या प्रस्थामुळे आपल्या देशामधील लहान लहान उद्योगांसमोर गंभीर संकट उभे ठाकले असून, त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे ऑनलाईन खरेदी वरवर चांगली दिसत असली तरी समाजासाठी अतिशय घातक ठरत आहे. ऑनलाईन शॉपिंगमध्ये वस्तूचे चांगले रेटिंग दाखवून ग्राहकांना खराब उत्पादने विकण्याचा सपाटा ई-कॉमर्स कंपन्यांनी लावला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांची ही एक प्रकारे दादागिरी असून, त्यावर वेळीच आळा घातला नाही तर पुढेही असे फसवणुकीचे प्रकार वाढीस लागून भारतीय ग्राहकांची लुबाडणूक सुरूच राहील.



ऑनलाईन साईटवर खरेदी करताना आधी ग्राहक त्या वस्तूचे रेटिंग आणि रिव्ह्यू बघतो. ४ ते ५ स्टार रेटिंग असलेल्या वस्तूंना ग्राहक आपली पसंती देतो. परंतु, चांगले स्टार रेटिंग असूनही त्या वस्तू प्रत्यक्षात खराब असल्याचा अनेक ग्राहकांचा अनुभव आहे. त्यामुळे या कंपन्यांच्या स्टार रेटिंगवरही प्रश्नचिन्ह लागले आहे. देशामध्ये अनेक मोठ्या कंपन्यांचा हा गोरखधंदा अजूनही सामान्य ग्राहकांच्या लक्षात न आल्याने त्यांची दररोज फसणवूक होत आहे. विदेशी कंपन्यांना येथील समाजहिताशी काहीएक देणे घेणे नसल्याने भरपूर पैसे कमविण्याच्या नादामध्ये स्पर्धेच्या युगात सर्व नीतिनियम गुंडाळून बाजार काबीज करण्यामध्ये तरबेज आहेत. विदेशी कंपन्या चांगले स्टार रेटिंग व रिव्ह्यूसाठी लोकांना लाच देत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या विदेशी ई-कॉमर्स कंपन्यांची विश्वसनीयता किती असेल याचा प्रत्येक खरेदीदाराने गंभीरतेने विचार करावा. प्रत्यक्षात दुकानामध्ये जाऊन केलेली खरेदी व ऑनलाईन खरेदीमध्ये खूप फरक आहे. प्रत्यक्ष केलेल्या खरेदीमध्ये वस्तू पारखून घेऊ शकतो. परंतु, ऑनलाईन खरेदी करताना त्यावेळी आपली पारखी नजर सहज धोका देऊन जाते. आपण घेत असलेली वस्तू प्रत्यक्ष नजरेसमोर नसल्याने फक्त अंदाज बांधून आपण ती घेत असतो. त्यामुळे ग्राहकांच्या या कमजोरीचा फायदा उचलून या कंपन्या खराब उत्पादने ग्राहकांच्या माथी मारत असल्याचा अनेकांचा अनुभव आहे. एकावर एक मोफत, ५० टक्के सूट अशा आमिषाला बळी पडून ग्राहक ऑनलाईन खरेदीच्या मायाजालात सहज अडकतो. खरेदी केल्यावर मात्र ती वस्तू मुळात स्थानिक बाजारामध्ये स्वस्त असल्याची जाणीव होते. परंतु, तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. कंपनी कोणतीही आणि कितीही मोठी असो, ती पैसा कमाविण्यासाठीच बाजारात आली आहे, हे ग्राहक विसरतो अन् फसव्या जाहिराती बघून लुबाडला जातो. विकली जाणारी वस्तू व अन्य साहित्य या कंपन्या तोट्यात का विकतील याचा आम्ही कधीच विचार करीत नाही. ऑनलाईन विक्री होणाऱ्या सर्वच वस्तू प्रत्येक शहरामध्ये उपलब्ध आहेत. परंतु, ऑनलाईन खरेदीमुळे आजकाल शहरामधील लहान लहान उद्योग डबघाईस येत असल्याचे पाहावयास मिळत आहे. त्यामुळे अनेकांच्या हाताचे काम हिरावले गेले आहे. त्यांचा रोजगार गेला अन् आपला खरेदीचा आनंदही हिरावला गेला. मिळणारा नफा विदेशी कंपनीच्या घशात जात असल्याने आपण स्वतः देशाचे किती नुकसान करीत आहोत हेसुद्धा आपल्या लक्षात येत नाही. एकदा या कंपन्यांनी वस्तू ग्राहकांच्या माथी मारली की तिची जबाबदारी संपते. ती वस्तू खराब असली तरी ती कंपनी ग्राहकांना सहजासहजी दाद देत नाही. त्यामुळे ऑनलाईन खरेदी शारीरिक कष्टाविना असली तरी ती पुढे त्रास देणारीच ठरते. परिणामी, या कंपन्यांचे सहज फावते. त्यामुळे आपली फसवणूक टाळण्यासाठी प्रत्येक ग्राहकाने स्थानिक बाजारपेठ निवडली तर आपले अन् देशाचेही भले होईल.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# श्रीराम मंदिराचे यशस्वी व्यवस्थापन

अयोध्येतील श्रीराम मंदिर पुनर्निर्माणाच्या निमित्ताने श्रद्धेपासून शास्त्रापर्यंत व निर्धारापासून निर्माणापर्यंत एवढेच नव्हे, तर व्यवस्थेपासून व्यवस्थापनापर्यंतचे अनेक कीर्तिमान प्रस्थापित केले. श्रीरामसेवकांच्या बलिदानी कारसेवेपासून विविध टप्प्यांवरील प्रखर उपक्रम - आंदोलनाची यशस्वी परिणती, भव्य श्रीराम मंदिराची निर्मिती व त्यावरील धर्मध्वजेच्या प्रतिष्ठापनेच्या निमित्ताने उभ्या जगाने पाहिली, अनुभवली. मात्र, श्रीराम मंदिर निर्माणापासून धर्मध्वजारोहणाच्या या प्रक्रियेमध्ये व प्रत्यक्ष निर्माणकार्यामध्ये प्रत्यक्ष प्रकल्प व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये विविध टप्प्यांवर व वेगवेगळ्या संदर्भात जी आव्हाने उभी ठाकली व त्या साऱ्यांवर यशस्वीपणे मात करून मुख्य म्हणजे, निर्धारित व इच्छित वेळेत हे कधी अशक्यप्राय वाटणारे रामकाज पूर्णत्वास नेले गेले, त्याला तोड नाही. यानिमित्ताने अयोध्येच्या श्रीराम मंदिर भवन निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी लिहिलेला लेख मुळातून वाचण्यासारखा आहे. या लेखामध्ये मंदिर निर्माणकार्याच्या विविध टप्प्यांचे साक्षी व प्रत्यक्षदर्शी असलेल्या नृपेंद्र मिश्रा यांनी त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना या संपूर्ण प्रक्रियेमध्ये विविध संदर्भात त्यांचे कामकाजच नव्हे, तर कार्यकर्तृत्वाचा कस लावणाऱ्या आव्हानांना सामोरे जावे लागले व त्यावर कशाप्रकारे मात करता आली व इच्छित मंदिरनिर्माण कशाप्रकारे साध्य केले गेले याचे थोडक्यात; पण महत्त्वपूर्ण वर्णन करण्यात आले आहेच. मुख्य म्हणजे, यानिमित्ताने यशस्वी प्रकल्प व्यवस्थापनाचा वस्तुपाठच त्यांनी सर्वांपुढे मांडला आहे, हे विशेष.

नृपेंद्र मिश्रा यांनी नमूद केल्यानुसार, अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या निर्माणकार्याला मोठे गतिमान पाठबळ मिळाले, ते सर्वोच्च न्यायालयाने ९ नोव्हेंबर २०१९ रोजी दिलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण निकालाने. या न्यायालयीन निकालाने रामजन्मभूमीच्या संदर्भातील मूळ प्रश्न व त्यावरील तर्क-कुतर्कांना पूर्णविराम देतानाच, सर्व तथाकथित विवादास्पद मुद्दे कायमस्वरूपी निकालात काढले. दशकांच्या न्यायालयीन लढ्याचा यानिमित्ताने यशस्वी समारोप तर झालाच. याशिवाय, या निकालाने निर्माण प्रकल्पांवर काम करणाऱ्या प्रत्येकामध्ये वेगळा जोश निर्माण करण्याचे महनीय काम केले.

त्यानंतर शास्त्रोक्त व रीतसर पद्धतीने भूमिपूजन करून प्रत्यक्ष राममंदिराच्या कामाला सुरुवात झाली व कामाच्या पहिल्याच टप्प्यात उभ्या जगाला कोरोनाने गाठले. अयोध्या पण त्याला अपवाद नव्हती. प्रवास-दळणवळण, सारे व्यवहार, माणसांचे कामकाज ठप्प झाले होते. अशाही परिस्थितीत श्रीराम मंदिराचे निर्माणकार्य सुरूच ठेवले. तेथील कामगार-कारागीर-अभियंत्यांनी चेहऱ्यावर मास्क लावून मर्यादित स्वरूपात, पूर्ण काळजी व निष्ठेसह आपले काम सुरूच ठेवले व तोसुद्धा एकाप्रकारे श्रद्धापूर्ण इतिहासाचा विषय ठरला.



त्यानंतर उत्खननानंतर असे लक्षात आले की, तेथील जमिनीवर सध्या प्रचलित व प्रगत पद्धतीने गाभ्यासह पाया बनविणे दीर्घकालीन स्वरूपात उपयुक्त होणार नाही. यामुळे पूर्वानुमानानुसार, सुरुवातीच्या टप्प्याला अधिक वेळ लागणार होता. याचा परिणाम प्रत्यक्ष मंदिरनिर्माणावर अपरिहार्यपणे होणार होता. दरम्यान, रात्रंदिवस काम जारीच होते. त्यादरम्यान, या अविरत प्रयत्नांना वेळेत व परिणामकारक स्वरूपात जोड दिली गेली, ती विशिष्ट प्रकारच्या दगडांच्या वापराची. मंदिरासाठी अशाप्रकारे प्रत्यक्ष निर्माणकर्त्यांचे प्रयत्न सुरू असतानाच, त्याला जोड मिळाली ती नॅशनल जिओ-फिजिकल रिसर्च इन्स्टिट्यूटची. निर्माणस्थळी अतिखोलवरच्या जमीन-मातीवर संशोधन करून त्याठिकाणच्या बांधकामाच्या सुरक्षिततेसाठी दगडी पायाची बांधणी अधिक मजबूत ठरेल, यावर त्यांनी शिक्कामोर्तब केले. परिणामी, राम मंदिराच्या पायासाठी सिमेंटऐवजी विशेष दगडांचा मजबूत दगडी पाया रचण्याचा निर्णय अंतिम झाला व त्यानुसार पायाच्या कामाला नव्या जोमाने सुरुवात झाली.

मात्र, त्यानंतर एक वेगळीच समस्या उभी ठाकली. राजस्थानातील पहारपूर पद्धतीच्या या दगडांचा मोठ्या प्रमाणात व विशिष्ट कालावधीत पुरवठा करण्यासाठी त्या क्षेत्रातील नेमक्या दगड खाणींमध्ये मोठ्या प्रमाणात खाणकाम-खोदकाम करणे अत्यावश्यक होते. पर्यावरण-संरक्षणाशी संबंधित नियमांनुसार, त्यासाठी राज्याच्या पर्यावरण मंत्रालयाची परवानगी मिळणे, तिथल्या दगडांएवढेच कठीण वाटत होते. मात्र, हे परवानगीचे कठीण वाटणारे काम श्रीरामकृपेने सुलभ झाले, हे विशेष.

प्रशासकीय परवानगीनंतर राजस्थानच्या विशिष्ट दगडी खाणींमधून एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर खाणकाम सुरू होऊन आवश्यक प्रमाणात दगड उपलब्ध झाले. मात्र, हे खाणकाम एकाच वेळी झाल्याने व मोठ्या प्रमाणावर दगड उपलब्ध झाल्याने एक वेगळी व तेवढीच मोठी समस्या निर्माण झाली. ती म्हणजे, या एवढ्या मोठ्या प्रमाणावर एकाच वेळी उपलब्ध झालेले दगड मंदिरस्थळी म्हणजेच अयोध्या येथे वाहून नेण्याची. यातून दगड वाहतुकीचे एक वेगळेच आव्हान पुढे आले. विशेषतः याकामी मोठ्या प्रमाणावर भारवहन करणाऱ्या मोठ्या व अवजड वाहनांची फार मोठ्या संख्येत एकाच वेळी व तुलनेने कमी कालावधीत एकत्र करण्याची आवश्यकता होती. याकामी देशभरातून राजस्थानशिवाय कर्नाटक, तेलंगण, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, ओडिशा, तामिळनाडू इ. राज्यांतून अवजड मालवाहतूक करणाऱ्या विशेष वाहनांची व्यवस्था केली गेली.

या साऱ्या प्रयत्नांकडे व श्रीराम मंदिर निर्माणकार्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांच्या पराकाष्ठेकडे आज वळून पाहताना श्रीराम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष म्हणून नृपेंद्र मिश्रा नमूद करतात की, श्रीराम मंदिराची उभारणी म्हणजे केवळ बांधकाम नव्हते, तर त्याद्वारे शतकानुशतके वंचित ठेवण्यात आलेल्या मंदिरनिर्माणाचे ते काम होते. हिंदूंची श्रद्धा व संस्कृतीचे आगामी युगांसाठी प्रेरणादायी केंद्र यानिमित्ताने उभे राहणार होते. नेमके हेच काम सर्वार्थांनी प्रत्यक्ष पूर्णत्वास गेले, ते २२ जानेवारी २०२४ रोजी प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेल्या श्रीरामललांच्या प्रतिमा प्रतिठापनेने. नृपेंद्र मिश्रा यांना मनापासून असे वाटते की, प्रत्यक्ष श्रीरामांच्या कामामध्ये बरीच विघ्ने आलीत व त्याचे यथायोग्य व यशस्वी निराकरण पण झाल्याचे दाखले मिळतात. नेमक्या याच अनुभवांचा पुनर्प्रत्यय अयोध्येतील राम मंदिर निर्माणकार्यादरम्यान त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना आला. अनेक आव्हानांना यशस्वीपणे व वेळेत तोंड देताना प्रत्यक्ष निर्माण समितीने ज्याप्रकारे व्यवस्थापकीय नियोजन केले, ते विलक्षण वाटते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### भाजपा व मित्रपक्षांची जबाबदारी वाढली

महापालिकेच्या निवडणुका संपन्न झाल्या आणि निकालही लागला. भाजपाने मोठ्या संख्येने महापालिका जिंकल्या. आता मात्र भाजपा आणि मित्रपक्षांची जबाबदारी वाढलेली आहे. त्यामुळे आता विरोधकांची तोंडं बंद करायची असतील तर त्यांना घसघशीत कामाची पावतीही तशीच द्यावी लागेल. कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात सांगितले की आता स्वतःची फुशारकी मारण्यापेक्षा कामाने त्याचे उत्तर द्यावे. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी अहंकारात राहू नये. आपण नगरसेवक आहोत अर्थात जनतेचे सेवक आहोत या अनुषंगानेच कामे करत राहिल्यास पुढे यापेक्षाही सरशी झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आता असे वाटते की भाजपाने नाराज निष्ठावंतांची नाराजी दूर करून त्यांना आपल्या सोबत घेऊन विकास कामात त्यांचेही योगदान घेणे गरजेचे आहे.

**श्रीपाद महाजन**/सोलापूर

### गणेश जन्म माघी चतुर्थीनिमित्त

अनलासुर या असुराला गणपतीने आपल्या धारण केलेल्या विराट स्वरूपात गिळून टाकले आणि त्यामुळे गणपतीच्या अंगाची लाही लाही होऊ लागली. त्यामुळे असह्य झालेल्या गजाननाला चंदनाचा लेप, डोक्यावर चंद्राची स्थापना, तसेच त्याच्या हातात कमळ देण्यात आले. शंकरांनी गळ्यातला नाग त्याच्या कमरेला बांधला, सर्वांगावर पाण्याचा अभिषेकसुद्धा करण्यात आला. पण उपयोग होत नाही हे पाहून अनेक ऋषींनी एकवीस दूर्वांच्या जुड्या त्याच्या मस्तकावर ठेवल्या आणि तेव्हा त्याच्या अंगाची लाही थांबली याच कारणाने गणेशाला २१ दूर्वा अर्पण केल्या जातात.

दुःखांना दूर करते त्याला दूर्वा म्हणतात. संसारातील काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षडरिपू दुःखाला कारणीभूत असतात हे वास्तव आहे. षडरिपू, ५ प्रपंच, चतुष्टय, त्रिगुण, द्वैत आणि शेवटी अद्वैत राहातो हे सर्व मिळून २१ होतात म्हणूनच गणेशाला २१ दूर्वा अर्पण करतात. अद्वैतापर्यंत सर्व आपल्या मूळ स्वरूपावर आरूढ होतात आणि आपण आपले मूळ स्वरूप विसरून जन्म-मरणाच्या फेऱ्यात फिरत राहातो त्यातून बाहेर पडण्यासाठी अद्वैताच्या उपासनेची गरज भासते म्हणूनच गणेशाला २१ दूर्वा वाहण्याची उपासना करावी. हीच उपासना केवळ भाद्रपद गणेशोत्सव व माघी गणेशोत्सवात करताना सातत्याने सुरू ठेवल्यास गणेश कृपा झाल्याशिवाय राहात नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

### झाले इलेक्शन, जोडा रिलेशन

नगर परिषद, नगर पंचायत व मनपा निवडणूक आता संपलेली आहे. या निवडणुकीत कुणाच्या वक्तव्यांनी कुणाची मने दुखावली असतील, कुणाच्या भावना दुखावल्या असतील, काही वाद-प्रतिवाद झाले असतील, कुणामुळे कुणाचा पराभव झालेला असेल तर आता ते सारे विसरून जावे. निवडणुकीपर्यंत हे सारे ठीक होते, पण आता विसरायला हवे. आपणा सर्वांना गावात, शहरात, वॉर्डात व प्रभागात राहावयाचे आहे. समाज म्हणजे सामाजिक संबंधांचे जाळे होय. आपण एकदुसऱ्यावर अवलंबून असतो. आपल्या सामाजिक गरजा एकदुसऱ्याला सहकार्य केल्यानेच पूर्ण होणार आहेत. आपण एकत्र राहिलो, झालं गेलं विसरून गेलो तर आपली मने पुन्हा जुळतील. आपल्या सामाजिक गरजा, सहकार्य, सद्भावाशिवाय आपण अपूर्ण राहू. पुन्हा मने सामाजिक भावनांनी जोडूया. निवडणुकीतील हेवेदावे विसरूया. खेळामध्ये खिलाडूवृत्ती असते. खेळ संपले की सर्व काही विसरून सर्व एकत्र येतात तसे आपणही निवडणुकीत झाले गेले विसरूया व एकदिलाने आपल्या प्रभाग, वॉर्डाच्या समस्या व अडचणी सोडविण्यास एक होऊया. कारण ही काळाची गरज आहे. "झाले इलेक्शन-आता जोडू रिलेशन."

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### रेल्वे विभागाने याकडे लक्ष द्यावे

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पश्चिम बंगालमधील मालदा टाऊन ते हावडा-कामाख्या-हावडा अशी नवीन स्लीपर वंदे भारत एक्सप्रेस सुरू केली. जी सामान्य प्रवाशांसाठी अत्यंत फायदेशीर ठरेल. माझी रेल्वे मंत्र्यांना विनंती आहे की, ज्या गाड्यांचे स्लीपर कोच काढून टाकण्यात आले आहेत आणि त्या जागी एसी थ्री-टायर कोच लावण्यात आले, त्या आता पुन्हा सुरू कराव्यात जेणेकरून प्रवाशांना कमी अंतराचा प्रवास करता येईल. कारण एसी थ्री-टायर कोचमध्ये कमी अंतराचे भाडे जास्त असते, ज्यामुळे प्रवाशांना एसी कोचमध्ये कमी अंतराचा प्रवास करावा लागतो. प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घ्यावी.

**राजेश कारिया**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### नेताजी सुभाष विद्यालयातील १० ब वर्गाची मानवत पोलीस स्टेशनला क्षेत्रभेट

**मानवत,/प्रतिनिधी:** नेताजी सुभाष विद्यालयातील १० ब वर्गातील




विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक संजय लाड आणि शिवराज नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली मानवत पोलीस स्टेशनला शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. या प्रसंगी महिला पोलीस अंमलदार चांदीवाले यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनचे कामकाज, नियंत्रण कक्ष, शस्त्रास्त्रे, तक्रार नोंद प्रक्रिया व पोलिसांचे दैनंदिन जबाबदाऱ्या याबाबत माहिती दिली. तसेच कायद्यांचे मूलभूत नियम व सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.
विद्यार्थ्यांनी नियंत्रण कक्ष ( ), रेकॉर्ड रूम आणि अधिकाऱ्यांच्या केबिनची पाहणी केली. पोलीस स्टेशनची ही प्रत्यक्ष भेट विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय अनुभव ठरला. यानंतर पीएसआय यांनी विद्यार्थ्यांना एमपीएससी व करिअरविषयक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी पोलीस दलाविषयी कृतज्ञता व्यक्त करत आभार मानले. या वेळी महिला पोलीस उपनिरीक्षक शीतल बोर्डे, सपोउपनिरीक्षक अशोक रोकडे, पोह नरेंद्र कांबळे, महिला पोलीस अंमलदार शकुंतला चांदीवाले, पोलीस अंमलदार चंद्रशेखर कावळे, तसेच विद्यालयातील वर्गशिक्षक उपस्थित होते.

### वरुड जिल्हा परिषद सर्कल मधून संगीता राजेंद्र थिटे भाजप यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल

**जिंतूर,/प्रतिनिधी-** येणाऱ्या पाच फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा





परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया १६ जानेवारीपासून झाली आहे परंतु आज दिनांक १९ रोजी पहिला उमेदवारी अर्ज जिल्हा परिषद गटासाठी दाखल करण्यात आला आहे संगीता ताई राजेंद्र थिटे यांनी आपला वरुड गटातून जिल्हा परिषद साठी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्वाचन अधिकारी श्री लाहोटी साहेब यांच्याकडे दाखल करण्यात आला असून यावेळी भाजपचे तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे संदीप लकडे नगरसेवक अशोकराव बुधवंत राजेंद्र थिटे शेवडी येथील सरपंच चांदज सरपंच वडाळी सरपंच बलसा येथील अशोक डोंबे सरपंच नामदेव राठोड सुधाकर घुगे सरपंच दामोदर घुगे डॉक्टर विवेक थिटे शालिग्राम रोकडे विश्वनाथ आडे मालेगाव भास्कर थिटे मालेगाव रमेश सडाळ रामभाऊ शेळके बालासाहेब फाटे प्रसाद राव बुधवंत माजी जिल्हा परिषद सदस्ययांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते वरुड सर्कल येथील संपूर्ण ग्रामीण भागातील भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी उमेदवारांची अर्ज भरण्यास गर्दी

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत सोमवारी जिल्हा परिषद गटासाठी दोन तर पंचायत समिती गणासाठी दोन असे एकूण चार उमेदवारी अर्ज दाखल झाले असून बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्यामुळे या दिवशी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे पूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सहा गटासाठी व पंचायत समितीच्या १२ गणाच्या निवडणुका शुक्रवारपासून पूर्णा तहसील कार्यालयात निर्वाचन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रतिभा गोरे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून तिसऱ्या दिवशी सोमवारी जिल्हा परिषदेच्या गौर गटासाठी दोन उमेदवारी अर्ज तर पंचायत समितीच्या गौर व धनगर टाकळी गणासाठी प्रत्येकी एक उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असून या दिवशी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल होणार आहे.

### प्रा. किरण सोनटक्के यांची राष्ट्रवादीस सोडचिठ्ठी देत शिवसेना उबाठातून जांब सर्कलमधून निवडणूक लढविणार

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी शिक्षक सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रा.



किरण सोनटक्के यांनी जिल्हा परिषद निवडणूकीच्या तोंडावर आपल्या पदाचा राजीनामा रविवारी दि .१९ दिला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना त्यांनी आपला राजीनामा सादर केला. दरम्यान, ते शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करुन जिल्हा परिषदेच्या जांब सर्कलमधून ते निवडणूक लढविणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या माध्यमातून कार्यरत असलेले प्रा. सोनटक्के हे गेल्या २१ वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रिय होते. यापूर्वी त्यांनी जांब सर्कलमधूनच राष्ट्रवादीच्या तिकीटावर निवडणूकही लढविली होती. मात्र त्यात ते पराभूत झाले होते. त्यानंतर राष्ट्रवादीच्या संघटनात्मक पदावर काम करतांना शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस, महानगर जिल्हाध्यक्ष व मागील वर्षभरापासून ते राष्ट्रवादी शिक्षक सेलचे प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. या जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत ते राष्ट्रवादीकडूनच जांब सर्कलमध्ये निवडणूक रिंगणात राहतील, अशी दाट शक्यता होती. मात्र रविवारी त्यांनी अनपेक्षितरीत्या राष्ट्रवादीच्या पदाचा तसेच प्राथमिक सदस्यत्वाचाही राजीनामा दिला.

विचारधारेशी विसंगत भूमिकेमुळेच निर्णय : प्रा. सोनटक्के

प्रा. किरण सोनटक्के यांनी आपल्या राजीनामा पत्रात महानगरपालिकेच्या निवडणूकीत पक्षाने घेतलेली भूमिका ही पक्षाच्या विचारधारेशी विसंगत असून त्याचा परिणाम निवडणूक निकालातून स्पष्ट झाला आहे. पक्षाची भूमिका सर्व लोकांनी नाकारली आहे. त्यामुळे मागील काही महिन्यांपासून होत असलेल्या घडामोंडींमुळे अस्वस्थ असल्यानेच तसेच पक्षाची बदनामी व राजकीय पडझड मनाला प्रचंड वेदना देणारी असल्याने आपण थांबण्याचा निर्णय घेतला आहे.

# पक्षनिष्ठेची ऐसे की तैशी रातोरात जिल्हा परिषद उमेदवारांची पळवापळवी

## जिल्हा परिषद निवडणूक : जिल्ह्यात पक्षांतरांना आलं उधान

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी:** नगरपालिका, महानगरपालिका निवडणूकांपाठोपाठ आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीतसुध्दा प्रमुख राजकीय पक्षांनी सर्वार्थाने सक्षम अशा उमेदवारांची शोधाशोध सुरु करतेवेळी अन्य पक्षातील इच्छुक उमेदवारांचीही पळवापळवी सुरु केली आहे.

या जिल्ह्यात गेल्या दोन चार महिन्यात नगरपालिका पाठोपाठ महानगरपालिका निवडणूकीच्या तोंडावर इच्छुक उमेदवारांची मोठ्या प्रमाणावर पक्षांतरे झाली. प्रत्यक्ष निवडणूकीतसुध्दा उमेदवारी न मिळाल्यापाठोपाठ या इच्छुक उमेदवारांनी स्व पक्षाविरोधात बंडखोरी करीत अन्य पक्षात सहजपणे उडी मारीत, उमेदवारी पटकावीत आव्हाने उभे केले. त्यामुळेच दोन्ही निवडणूकांमध्ये मोठ्या प्रमाणावर राजकीय समिकरणे बदलली. लढतीचं चित्रसुध्दा पूर्णतः बदलले होते. त्याचे साद पडसाद निकालातून दिसून आले.

या पार्श्वभूमीवर या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीतसुध्दा गटा-गणात गेल्या दोन-चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर पक्षांतरांचे पेव उठले आहे. त्याचे कारणसुध्दा स्पष्ट आहे. या निवडणूकीतसुध्दा न.प. व मनपा प्रमाणे प्रमुख राजकीय पक्षांकडे शंभरटक्के जागा लढविण्याइतपत उमेदवार नाहीत. किंवा त्या त्या गटा गणातील लढतीत उतरण्याकरीता सक्षम असे उमेदवारसुध्दा नाहीत. त्यामुळेच या जिल्ह्यातील मातब्बर नेतेमंडळींनी त्या त्या गटा गणातील स्व पक्षासह अन्य पक्षातील इच्छुक उमेदवारांचा शोध घेऊन चाचपणी सुरु केली आहे. त्यातून काही सक्षम उमेदवार गळास लागतील का, या दृष्टीनेसुध्दा डावपेच टाकले आहेत. त्याचे परिणामसुध्दा या दोन-चार दिवसात दिसू लागले आहेत. त्यामुळेच या निवडणूकीतसुध्दा न.प. व मनपा प्रमाणे त्या त्या तालुक्यात आयात केलेल्या उमेदवारांचा मोठ्या प्रमाणावर प्रमुख राजकीय पक्षाच्या उमेदवारी यादीत समावेश असेल, अशी स्पष्ट चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत गटा गणातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून उमेदवारी अर्ज भरण्याच्या अंतीम मुदतीच्या आत या जिल्ह्यात पक्षांतराचे हे सोहळे मोठ्या प्रमाणावर होतील. त्यातून एक एक धक्के बसतील, असे चित्र आहे.

प्रा. किरण सोनटक्के शिवसेना उबाठा गटाच्या गळाला...

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिक्षक सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के यांनी सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या पदासह सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्याचे कारणही स्पष्ट केले. परंतु, प्रा. सोनटक्के यांची पुढील दिशाही या राजीनाम्या पाठोपाठ स्पष्टपणे दिसून आली. विशेषतः शिवसेना उबाठा गटाच्या माध्यमातून ते परभणी तालुक्यातील जांब या गटातून निवडणूक रिंगणात उतरतील, अशी खूलेआमपणे कुरबुरसुध्दा सुरु झाली.

मनिषा केंद्रे भारतीय जनता पार्टीत दाखल...

जिंतूर तालुक्यातील या निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर मनिषा केंद्रे यांनी सोमवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली, प्रमुख उपस्थितीत केंद्रे यांनी हे पक्षांतर केले. केंद्रे या भाजपाद्वारे जिल्हा परिषद निवडणूकीच्या रिंगणात असतील, अशी शक्यता आहे.

### बटेंगे तो करेंगे एक है तो सेफ है भाजपचा नारा भाजपलाच कळाला नाही

**नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीमध्ये युती न केल्यामुळे भाजप सेनेसह राष्ट्रवादीचाही सुपडा साफ झाला तरी देखील अजून यातून बोध न घेता युतीच्या चर्चे चे गुऱ्हाळ अजूनही सुरूच आहे चर्चेच्या बैठकीतून निघून जाण्याची भाजपची जुनीच प्रथा अजूनही सुरू आहे महापालिकेला भाजपने शिवसेना व राष्ट्रवादीसोबत युती केली असती तर आज ही परिस्थिती ओढवली नसती विधानसभेला व लोकसभेला भाजपनेच बटेंगे एक है तो सेफ है हा नारा दिला होता परंतु हा नारा आता भाजपवाले सपशेल विसरले आहेत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये भाजप सेनेची युती न झाल्यास महापालिकेपेक्षाही अति गंभीर परिणाम महायुतीतील सर्वच घटक पक्षांना भोगावे लागणार आहेत महायुतीतील पक्ष वेळी शहाणे न झाल्यास परभणी जिल्ह्यातून त्यांच्या अस्तित्व संपायला वेळ लागणार नाही.**

### पाथरीत आज काँग्रेसचे शक्तीप्रदर्शणाने उमेदवारी अर्ज दाखल होणार



**पाथरी,/प्रतिनिधी:** गेली चार पाच पंचवार्षीक निवडणुकीत काँग्रेस पक्षाला उमेवार ही मिळत नव्हता,मिळालाच तर त्याला डिपॉझिट वाचेल एवढेही मते मिळाली नसल्याचे उदाहरण आहेत. या वेळी माजी आ बाबाजानी दुर्रानी यांनी काँग्रेस मध्ये प्रवेश केल्या नंतर न प निवडणुकीतील पराभव बाजूला सरात नवी निवडणुक नवा डाव म्हणत जोरदार तयारी करत जवळपास पाच ही जि प गटात नव्या होतकरू चेह-यांना संधी देत विजयाची गणिते बांधली असून बुधवार २१ जानेवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मोठे शक्ती प्रदर्शन करण्याची तयारी केली असून काँग्रेस पक्षाच्या वतीने पाच गटातील सर्व गणां मधील उमेदवार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ बाबाजानी दुर्रानी यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. माजी आ बाबाजानी दुर्रानी यांनी तालुक्यातील आपला दबदबा कायम ठेवण्या साठी या वेळी पाच गटातील दहा गणात चर्चेतील नवे चेहरे देण्याचा प्रयत्न करत असतांनाच युती आघाडीची चर्चाही सुरू ठेवल्याचे सांगितले जात आहे. तालुक्यातील बाभळगाव गट आणि हादगाव गट चर्चेचा विषय असून या दोन गटात अतिषय चुरशीची लढत पहावयास मिळेल असे सांगितले जात असले तरी अर्ज मागे घेण्याच्या तारखे नंतरच लढतींचे खरे चित्र समोर येणार आहे. माजी आ दुर्रानी यांनी बाभळगाव गटातून जिल्हाभरात परिचित असलेले समाजसेवक प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ जगदीश शिंदे यांना गळाला लावत बाभळगाव गटातून त्यांच्या मातोश्रीला उमेदवारी दिली असून कान्सूर गणातून माजी सभापती सुभाष आबा कोल्हे यांच्या चिरंजिवांना तर बाभळगाव गणातून कृउबासचे उपसभापती शाम धर्मे यांना मैदानात उतरवले असल्याने या गटात काँग्रेस मजबुत स्थितीत असल्याची चर्चा तालुका भरात होत आहे. तर लिंबा गटातून जिल्हाबँकेचे संचालक दत्तराव मायंदळे यांना ऊमेदवारी दिली असून कासापुरी येथून अनंत वाकणकर या नवयुवकाला संधी दिली आहे. बुधवारी काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व उमेदवारांचे उमेदवारी अर्ज शक्तीप्रदर्शन करत दाखल करण्यात येणार असल्याचे काँग्रेस चे युवा नेते डॉ जगदीश शिंदे यांनी सांगितले. बाभळगाव गटातील दोन्ही गणांतील उमेदवारांचे अर्ज भरण्या साठी पाथरी-सोनपेठ महामार्गा वरील हॉटेल सुर्या गार्डन रेस्टॉरंट पासून मोटार सायकल रॅली व्दारे शहरात दाखल होऊन अर्ज भरणार असल्याचे डॉ शिंदे यांनी सांगितले. याच दिवशी बहुतांशी इतर पक्षांचे उमेदवार उमेवारी अर्ज दाखल करतील असे चित्र आहे. मंगळवारी राकाँच्या उमेदवारांनी कृऊबास मैदानातून रॅली काढत उमेदवारी अर्ज दाखल केले.

# महाराष्ट्राचे दिग्विजयी धुरंधर : देवाभाऊ !

**पूर्णा,/प्रतिनिधी :** राज्याचे



कर्तबगार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्याचा निर्विवाद असा ठसा महाराष्ट्रातल्या तमाम जनतेच्या मनावर तर उमटवलाच पण पालिकेपाठोपाठ महानगरपालिकांच्या झालेल्या निवडणुकांमध्येही भारतीय जनता पक्षाला अव्वल स्थान मिळवून दिले आहे. मुंबईत पहिल्यांदा भाजपचा महापौर होणारच पण राज्यात महापालिका निवडणुकीत १४२६ भाजपचे नगरसेवक निवडून आले हे त्यांच्या नेतृत्वाखालील यश दैदिप्यमान आहे. विधानसभा निवडणुकीत आपला ब्रँड देवेंद्रजी यांनी महाराष्ट्राला दाखवून दिला. आज महाराष्ट्राच्या जनमानसावर त्यांच्या नेतृत्वाची अमीट अशी छाप आहे. हे नेतृत्व संघर्षातून आलेले आणि अनेक वादळे पचवून समर्थपणे उभे राहिलेले आहे. आजच्या घडीला देवेंद्रजी हेच महाराष्ट्राचे धुरंधर आहेत. आज देवाभाऊ हे महाराष्ट्राच्या गळ्यातील ताईत झाले आहेत. राज्याच्या विकासाच्या असंख्य योजना त्यांच्या कल्पकतेतून पुढे येतात. या योजनांना भविष्याचे स्वप्न असते. नव्या काळाची चाहूल असते. देवाभाऊ केवळ एखादी संकल्पना मांडून थांबत नाहीत तर ती संकल्पना पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली धडाडी, प्रचंड परिश्रम घेण्याची तयारी आणि यश प्राप्त होत नाही तोवर अथक संघर्ष करण्याची जिद्द या बाबी त्यांच्या नेतृत्वात आहेत. महापालिका निवडणुकीच्या निकालाने हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

देवेंद्रजी यांच्या नेतृत्वाची चढती कमान दिवसेंदिवस विस्तारताना दिसून येत आहे. एक काळ असा होता की महाराष्ट्रात विरोधी पक्षांनी अनेक कारस्थाने करून देवाभाऊंना खिंडीत गाठण्याचे प्रयत्न केले. त्यांना राजकीयदृष्ट्या खिळखिळे करण्यासाठी जंग जंग पछाडण्यात आले पण देवेंद्रजी यांनी संयम सोडला नाही. आपल्या कार्यापासून ते तसूभरही ढळले नाहीत. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबईपासून ते पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव अशा सगळ्याच ठिकाणी भारतीय जनता पक्षाने दणदणीत असे यश मिळवले. जवळपास ८३ टक्के महापालिकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मित्र पक्षांच्या मदतीने सत्ता स्थापनेचा टप्पा गाठला आहे. २९ पैकी २४ ठिकाणी भाजप व महायुतीची सत्ता आली आहे. त्यापैकी नऊ महापालिका भारतीय जनता पक्षाने स्वबळावर जिंकल्या आहेत. कार्यकर्त्यांचे राजकीय भविष्य घडविणाऱ्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एवढ्या वर्षानंतर महाराष्ट्रात पार पडल्या पण या निवडणुकांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना प्रचंड असा आत्मविश्वास दिला.

महापालिका निवडणुकीत देवेंद्रजी यांचा आश्वासक चेहरा मतदारांना ठाम विश्वास मिळवून देणारा ठरला. हिंदुत्व हा भारतीय जनता पक्षाचा पाया आहे, हे हिंदुत्व अत्यंत व्यापक आहे, ते कोणत्याही अर्थाने संकुचित नाही. आपला जो आत्मा आहे तो हरवू न देता देवाभाऊंनी विकासाची जोड त्याला दिली. राज्यातल्या जनतेने त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला. सगळीकडे स्वबळावर निवडणुका लढवल्या गेल्याने भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. स्वबळामुळे कार्यकर्त्यांना संधी मिळाली. आपला पक्ष आपल्याला योग्य संधी देऊ शकतो ही जाणीव कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झाली. कोणतीही निवडणूक असो देवाभाऊ ती अत्यंत गांभीर्याने घेतात. काटेकोर नियोजन, जनतेच्या विकासाचे मुद्दे, त्या त्या ठिकाणच्या स्थानिक प्रश्नांची दखल, योग्य पदाधिकाऱ्यांवर योग्य जबाबदारी सोपवून त्यांच्यावर टाकलेला विश्वास यामुळे आज भारतीय जनता पक्षाला प्रचंड असे राजकीय यश महापालिकेच्या निवडणुकीत मिळाले आहे. हे यश अपूर्व आहे मात्र या यशानंतरही देवेंद्रजी यांच्यासारखा प्रचंड क्षमतेचा नेता आपल्या कार्यकर्त्यांना संयमाची शिकवण देतो. विजयाचा उन्माद नको, जबाबदारीने वागावे. असे देवेंद्रजी कार्यकर्त्यांना सांगतात. निवडणुकीच्या काळात झालेल्या त्यांच्या जाहीर सभांनी वातावरण पूर्णपणे बदलले या सभा भारतीय जनता पक्षाला विजयामध्ये परावर्तित करणाऱ्या ठरल्या.

नगरपालिकांच्या निवडणुकीत सुद्धा भारतीय जनता पक्षाचे यापूर्वी १६०२ सदस्य होते. देवेंद्रजींच्या नेतृत्वाखाली ही संख्या ३३२५ एवढी झाली. जिथे ९४ नगराध्यक्ष होते तिथे ही संख्या १२९ एवढी झाली. पालिका निवडणुकीत जे उत्तुंग यश देवेंद्रजींनी मिळवले त्याच यशाचा विक्रम त्यांनी पुन्हा महापालिकेच्या निवडणुकीत रचला. ज्याप्रमाणे क्रिकेटच्या क्षेत्रात सचिन तेंडुलकर यांनी स्वतःचे आधीचे विक्रम मोडत नवे विक्रम रचले त्याच पद्धतीने देवेंद्रजींचे हे कार्य आहे. राज्यातल्या महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा स्ट्राईक रेट हा सर्वाधिक म्हणजे ६४. ५९% एवढा राहिला.

एखादे नेतृत्व जेव्हा एवढे उत्तुंग यश संपादन करते तेव्हा त्यामागचे परिश्रम विचारात घेतले पाहिजेत. राज्याला सर्वार्थाने प्रगतीपथावर नेण्याच्या दृष्टिकोनातून देवेंद्रजी यांची धडाडी ऐतिहासिक स्वरूपाची आहे शेतकऱ्यांना मोफत ऊर्जा देणाऱ्या योजनेने विश्वविक्रम प्रस्थापित केला. एकाच महिन्यात सौर कृषी पंप योजनेने ४५ हजार २११ सौर कृषी पंप बसवले. या उपक्रमाची गिनीज बुक मध्ये नोंद झाली. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी देवेंद्रजी यांनी घेतलेला पुढाकार आज महाराष्ट्राच्या शेती त्र प्रगतीपथावर नेणारा ठरला आहे. अनेकदा पाणी असूनही विजेअभावी पिके जळताना शेतकऱ्यांना पहावी लागत. शेवटी देवाभाऊंनी सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या शेतीचा प्रश्न यशस्वीरित्या सोडवला.



महाराष्ट्राला सर्वार्थाने प्रगतीपथावर नेणारी सर्व धोरणे अलीकडच्या काळात देवेंद्रजी यांनीच राबवली. समृद्धी महामार्ग असो अथवा शक्तीपीठ असो. महानगरांमध्ये मेट्रोसारख्या सुविधा निर्माण करून दळणवळण गतिमान करणे जसे आवश्यक आहे तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सर्व महत्त्वाच्या शहरांना जोडणारे रस्तेही आवश्यक आहेत. देवेंद्रजी यांनी सातत्याने पायाभूत सुविधांवर भर दिला आहे. त्यांचा विकास हा शाश्वत प्रश्नावर आधारित आहे. जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवणारा आहे. कोणत्याही निवडणुकीत महाराष्ट्रातल्या लाडक्या बहिणी आपल्या देवाभाऊंच्या पाठीशी खंबीरपणे राहतात याचे कारण सर्व क्षेत्रातल्या गरजू महिलांना या योजनेने मोठा दिलासा मिळाला आहे. आरोग्य, शिक्षण अशा बाबतीतल्या छोट्या छोट्या समस्या या महिला भगिनी लाडकी बहीण योजनेमुळे सोडवू शकतात. कारण त्यांच्या हाती हक्काचा पैसा आला आहे. काही झाले तरी ही योजना बंद पडू देणार नाही उलट लाडकी बहीण नंतर लखपती योजनेच्या माध्यमातून महिलांना आणखी आर्थिक निर्भर करण्याचा विचार देवाभाऊंनी सातत्याने बोलून दाखवला आहे. त्यांच्या यशस्वी वर्षपूर्तीचा आनंद सर्वांनीच साजरा केला. या वर्षभराच्या काळात असंख्य अडथळे आणि आव्हाने आली परंतु या सर्व आव्हानांना एखाद्या पराक्रमी योद्धयासारखे त्यांनी परतवून लावले. मार्गात अडथळे आणणाऱ्या शक्तींना, प्रवृत्तींना नेस्तनाबूत केले. महाराष्ट्र आता थांबणार नाही हे आपल्या कर्तृत्वातून सातत्याने दाखवून दिले.

राज्याचे कर्तबगार मुख्यमंत्री, राज्यातली कायदा व सुव्यवस्था राखणारे गृहमंत्री, राज्यातला सामाजिक समतोल कायम ठेवून सर्व समाजाच्या भल्यासाठी झटणारे लोकनेते, प्रशासनावर जबरदस्त पकड असणारे कठोर प्रशासक, सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मनात आपल्या कर्तबगारीने विश्वास निर्माण करणारे महाराष्ट्राचे कुटुंबप्रमुख, भल्या भल्या राजकीय विरोधकांना धडकी भरवणारे धुरंधर राजकारणी, भविष्यकालीन विकासाचा पाया रचणारे कार्यसम्राट अशा विविध रूपांनी आज देवाभाऊच्या नेतृत्वाने महाराष्ट्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. स्वतःच्या कर्तबगारीवर भक्कम असे स्थान निर्माण करणारा अफाट क्षमतेचा नेता म्हणून देवेंद्रजी यांचे नाव महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात आता कायमचे नोंदले गेले आहे.

महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला अभूतपूर्व यश मिळण्यासाठी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. रवींद्रजी चव्हाण यांनी घेतलेले परिश्रम आणि निवडणूक प्रमुख श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी नियोजनासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना निवडणुकीदरम्यान दिलेली वैचारिक शिदोरी या गोष्टी नक्कीच महत्त्वाच्या आहेत. ज्याप्रमाणे पालिका, महापालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने आघाडी मिळवून विक्रम प्रस्थापित केला त्याच पद्धतीने ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीतही भाजप असेच सर्वाधिक जागांचे विक्रम प्रस्थापित करील याबद्दल मनात तीळ मात्रही शंका नाही.

आज समाजातल्या सर्व घटकांचा विचार करणारे कल्याणकारी राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख संपूर्ण देशात अभिमानाने घेतला जातो. सौर कृषी पंप योजनेचा लाभ घेतलेला सामान्य शेतकरी असो अथवा उद्योगांना पायाभूत सुविधा मिळाल्याने स्वतःचे उद्योग विश्व उभारणारा एखादा उद्योजक असो अशा सर्वांनाच देवाभाऊंच्या नेतृत्वाचा आधार वाटतो. हे नेतृत्व महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेईल, आणि या नेतृत्वाच्या माध्यमातूनच महाराष्ट्राची सध्या चालू असलेली घोडदौड आणखी गतिमान होईल यावर सर्वांच्याच मनात पक्की खात्री आहे. देवाभाऊंना अडचणीत आणण्याचे अनेक प्रयत्न झाले. विविध आंदोलनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातले सामाजिक वातावरण बिघडविण्याचाही प्रयत्न झाला पण देवाभाऊंनी महाराष्ट्रात हे वातावरण बिघडू दिले नाही. महाराष्ट्र हे प्रगतिशील, संपन्न, समृद्ध असे राज्य आहे आणि ते यापुढेही असेच देशाच्या नकाशावर गौरवाने झळाळत राहील याची खात्री सबंध महाराष्ट्राला देवेंद्रजी यांच्या रूपाने आहे. भारतीय जनता पक्षाला एकाच वेळी वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये राजकीय यश मिळवून देत असतानाच महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा इतिहास देवाभाऊंच्या नेतृत्वाखाली सुवर्णाक्षरांनी लिहिला जात आहे. आज घडीला तेच महाराष्ट्राचे धुरंधर आणि निर्विवाद नेते असल्याचे त्यांनी आपल्या अफाट कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. केवळ मीच नव्हे तर माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांचा ऊर अभिमानाने भरून यावा असे दैदीप्यमान कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या देवाभाऊंचे अंत:करणपूर्वक अभिनंदन !

**मा.श्री.रामकिशन रौंदळे**

प्रदेश कार्यकारिणी सदस्य,
भारतीय जनता पक्ष

# आरटीई शाळा नोंदणी व व्हेरिफिकेशनला मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० जानेवारी**

राज्यात शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत २५ टक्के आरक्षित जागांवरील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. मात्र, या प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या शाळा नोंदणी व व्हेरिफिकेशनला बीड जिल्ह्यात अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने शाळा नोंदणी व व्हेरिफिकेशनसाठी २७ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. दरम्यान, दिलेल्या वाढीव मुदतीत शिक्षण विभागाने सर्व पात्र शाळांची नोंदणी पूर्ण करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेशाची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते व आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.

यापूर्वी शाळा नोंदणी व व्हेरिफिकेशनची प्रक्रिया ९ ते १९ जानेवारीदरम्यान पूर्ण करण्याचे निर्देश होते. मात्र, अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आतापर्यंत जिल्ह्यात फक्त १३८ शाळांचीच नोंदणी आरटीई पोर्टलवर झाली आहे. त्यामुळे आरटीई अंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संधी मर्यादित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती.

आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याच्या अनुषंगाने शासनाने शाळा नोंदणी व व्हेरिफिकेशनची लिंक कार्यान्वित केली होती. विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांना या कालावधीत नोंदणी करणे बंधनकारक होते. मात्र, तांत्रिक अडचणी, माहितीचा अभाव, प्रशासकीय कारणांमुळे आणि शाळांच्या उदासीनते मुळे अनेक शाळांची नोंदणी वेळेत पूर्ण होऊ शकली नाही. तेव्हा शिक्षण विभागाने जलद गतीने कारवाई करत शाळा नोंदणी पूर्ण करावी अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे. २७ जानेवारीपर्यंत शाळा नोंदणी व व्हेरिफिकेशन पूर्ण झाल्यानंतरच पुढील प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**नारायण ई-टेक्नो स्कूलची नोंदणी अपेक्षित**

नारायण ई-टेक्नो स्कूल सुरू होऊन तीन वर्षे पूर्ण झाली असून, शासनाच्या नियमानुसार यावर्षी या शाळेची आरटीई पोर्टलवर नोंदणी होणे अपेक्षित आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने या शाळेची तातडीने आरटीई अंतर्गत नोंदणी करून घ्यावी, अशी मागणीही मनोज जाधव यांनी केली आहे.




केज येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई यांच्या मार्फत रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती व मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता गंगा माऊली साखर कारखाना, केज येथे मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात ऊस वाहतूक करणारे वाहनचालक, बैलगाडी चालक तसेच साखर कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी यांना रस्त्यावरून ऊस वाहतूक करताना घ्यावयाची आवश्यक काळजी, अपघात टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना तसेच अपघात घडल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मोटार वाहन कायद्यातील तरतुदी समजावून सांगत सामाजिक भान ठेवून सुरक्षित वाहतूक करण्याचे आवाहन करण्यात आले.

# वै.किसनबाबांच्या पवित्र वास्तव्याने पावन झालेल्या गोरक्षनाथगडावर लाखो भाविकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० जानेवारी**

येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र गोरक्षनाथगडावर धर्मनाथ बीज निमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते. ते म्हणाले की, वै.किसन बाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गोरक्षनाथगडावर लाखोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती दिसू लागली आहे.

मंगळवार वै.ह.भ.प.किसनबाबा महाराज यांच्या आशीर्वादाने व मठाधिपती नवनाथ बाबा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह श्री क्षेत्र गोरक्षनाथगडावर आयोजित करण्यात आला होता. मंगळवार दि.२० रोजी ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन होते. याप्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, ह.भ.प.अखंडानंद गिरी महाराज, माजी आमदार बदामराव पंडित, मराठा समाजाचे नेते मनोजदादा जरांगे पाटील, डॉ.योगेश क्षीरसागर, गंगाधर घुमरे, अरुण डाके, जगदीश काळे, विलास बडगे, गणपत डोईफोडे, अ‍ॅड.राजेंद्र राऊत, राजेंद्र मस्के, कुंडलिक खांडे, गंगाधर काळकुटे, परमेश्वर सातपुते, ज्ञानदेव काशिद, ऋषिकेश बेदरे, हरिदास जोगदंड, सखाराम मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, धर्मनाथ बीजेला यावर्षी ७५ वर्षे पूर्ण होत असून याची सुरुवात वै.किसन बाबा यांनी केलेली आहे. त्यानिमित्त गोरक्षनाथ गडावर प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. म्हणून वै.किसन बाबा यांचे नाव घेतले जाते. त्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली असून ह.भ.प.शांतीब्रह्म नवनाथबाबा यांच्या मार्गदर्शनाखाली या तीर्थक्षेत्राची महती आणि महत्त्व वाढू लागले आहे.



# चांगले रस्ते, शाळा, शुध्द पाणी ही गावाच्या विकासाची ओळख: खा.बजरंग सोनवणे

## टाकळी (ता.केज) येथे विविध विकासकामांचे लोकार्पण



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२० जानेवारी**

चांगले रस्ते, शुद्ध पाणी, वीजपुरवठा व बालकांसाठी अंगणवाडी सुविधा, दर्जेदार शाळा या गावाच्या खऱ्या विकासाची ओळख असल्याचे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले.तालुक्यातील टाकळी (ता.केज) येथे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विविध विकासकामांचे उद्घाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी ते बोलत होते. गावाच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारी तसेच भविष्यातील पिढीसाठी दिशा देणारी ही कामे टाकळीच्या प्रगतीच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा असल्याचे खा.सोनवणे यांनी यावेळी सांगितले. या प्रसंगी टाकळी ते पाचीअंबा वस्ती रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले असून, या मार्गामुळे दळणवळण सुलभ होणार आहे. तसेच गावअंतर्गत स्मशानभूमीचा विकास, दलितवस्ती व कदमवाडी येथे अंगणवाडी खोली बांधकाम, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी पाणी फिल्टर बसविणे, गावासाठी २४ तास गावठाण लाईट फिटर सुविधा सुरू करण्यात आली आहे. इजगर लवन तलाव येथे नवीन उफेज रोहित्र (डी.पी.) बसविणे, लक्ष्मी आई मंदिर परिसरात सभा मंडप बांधकाम, मैनाजीच्या वस्तीला जाणारा सिमेंट रस्ता तसेच केज ते धनवाडा (भगवानबाबा वस्ती) रस्त्याचे मजबुतीकरण व खडीकरण अशी विविध कामे लोकार्पित करण्यात आली. या विकासकामांमुळे महिला, शेतकरी बांधव, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.उद्घाटनप्रसंगी ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी, युवक कार्यकर्ते व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

# लघुउद्योग पुरस्कार योजनेसाठी २३ जानेवारी पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० जानेवारी**

जिल्हास्तरावर लघु उद्योग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणा-या लघु उद्योग घटकांना सन २०२४ व २०२५ या दोन वर्षाचे जिल्हा पातळीवरील प्रथम व द्वितीय जिल्हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी जिल्हयातील पात्र सुक्ष्म, लघु उद्योग घटकाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. निवड केलेल्या उद्योग घटकास स्मृती चिन्ह व प्रथम पुरस्कारासाठी रु.१५०००/- आणि द्वितीय पुरस्कारासाठी रु.१००००/- रोख रक्कम माननीय पालकमंत्री यांचे शुभहस्ते देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे. तरी खालील अटींची पुर्तता करणा-या लघु उद्योग घटकांनी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांचेकडे विहीत नमुन्यातील अर्ज खालील कागदपत्रासह सादर करावेत.

१. उद्योग घटक मागील पाच वर्षापासून नियमित उत्पादन असणे आवश्यक आहे.२. लघु उद्योग घटकाने पाच वर्षापुर्वी स्थायी उद्योग नोंदणी केलेली असावी.३. मागील तीन वर्षामध्ये घटकास सातत्याने नफा (Profit) झालेला असावा व रोजगार निर्मितीमध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. ४. कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.५. लघु उद्योग घटकास यापूर्वी कोणताही राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला नसावा.

६. उत्पादनासाठी नविन तंत्रज्ञान अवलंबिलेल्या घटकास प्राधान्य राहील.

सन २०२४ व २०२५ करीता जिल्हा पुरस्कार योजनेतंर्गत जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांचेकडे अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २३.०१.२०२६ आहे.बीड जिल्ह्यातील लघु उद्योजकांनी सदर योजनेच्या अर्जासाठी व या बाबतच्या अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, शिवशारदा सुझुकी शोरुम शेजारी, हॉटेल गुडलक जवळ, जालना रोड, बीड दुरध्वनी क्र.०२४४२-२२२२८५ ई-मेल आयडी, didic.beedmaharashtra.gov.in यावर संपर्क साधावा, असे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जि.प.प्रा.शा. मोगरा येथे 'आनंदनगरी' उपक्रमाचे यशस्वी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२० जानेवारी**

तालुक्यातील जि.प.प्रा. शाळा मोगरा शाळेत आनंदनगरी या अभिनव उपक्रमाचे प्रभावी व नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेने पारंपरिक शिक्षणाबरोबरच उद्योजकता, व्यवहारज्ञान व कौशल्याधिष्ठित शिक्षण यांचे प्रत्यक्ष अनुभवाधारित धडे विद्यार्थ्यांना दिले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गिण्यान देव राठोड हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख, के.प्रा. शा. मरी - विठ्ठल आरबे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र इंगळे व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सिराज काझी यांनी उपस्थिती दर्शवली.यावेळी ग्रामपंचायत सदस्य संदीप सावंत, माणिक राठोड, भारत घनघाव, सुभाष शिंदे, श्रीकृष्णा शिंदे, विक्रम शिंदे, अमजद तांबोळी, विकास झेटे, गुंडाभाऊ शिंदे, रमेश तळेकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक सुभाष घनघाव यांच्या नेतृत्वाखाली बालाप्रसाद चव्हाण,हानुमंत पाढरपोटे,सोनवळे सर, गायके मॅडम, आबुज मॅडम व शिंगारे सर यांनी प्रभावी टीमवर्कद्वारे मोलाचे सहकार्य केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चव्हाण सर तर प्रस्ताविक: घनघाव सर, मार्गदर्शन: विठ्ठल आरबे सर यानी केले.या उपक्रमास आर्थिक व भौतिक पाठबळ देताना सरपंचांनी ५,०००/- पाच हजार रोख देणगी दिली, तर उपसरपंचांनी प्रोजेक्टर व संगणक उपलब्ध करून देण्याचे सहकार्य जाहीर केले. ही बाब शाळेच्या डिजिटल व शैक्षणिक क्षमतावाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरली.आनंदनगरी अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारून उत्पादन, विक्री, किंमतनिर्धारण व ग्राहक संवाद यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. पालकांनी स्टॉल्समधून खरेदी करून पदार्थांचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेला प्रोत्साहन दिले.एकूणच हा उपक्रम विद्यार्थी-केंद्रित, कौशल्यविकासाभिमुख आणि समाजसहभागातून शाळेचा सर्वांगीण विकास साधणारा ठरला.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींच्या संघाला राज्यस्तरीय स्पर्धेत कांस्य पदक

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२० जानेवारी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व लातूर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १८ जानेवारी उदगीर येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ १९ वर्ष वयोगटातून राज्यात तृतीय आला आहे, या स्पर्धेमध्ये छ. संभाजीनगर विभागाचा पहिला सामना नागपूर विभागाशी झाला, अगदी सरळ २-० ने हा सामना जिंकून सेमीफायनल चा सामना कोल्हापूर च्या संघाशी चूर्षीचा २-१ असा झाला , व तृतीय क्रमांकाचा सामना लातूर विभागाशी झाला लातूर विभागाला सहज पराभव करून २-० ने विजय मिळवून, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा संघ कांस्य पदकाचा मानकरी ठरला.




या संघामध्ये सहभागी खेळाडू कर्णधार वैष्णवी कोरडे, आदिबा शेख, आसावरी शिंदे, आरती जाधव, गौरी गायकवाड या मुलींचा सहभाग होता,विजेत्या खेळाडूंना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश भाऊ चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. स्वप्निल टाक , प्रा. संजय बागुल, प्रबंधक प्रशांत चव्हाण, प्रा. इम्रान पठाण प्रा. डॉ. एकनाथ शेंडगे यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# अन्न औषध प्रशासनाने घेतली ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या निवेदनाची तात्काळ दखल-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२० जानेवारी**

दैनंदिन जीवनात व सणासुदीच्या काळात खाद्यपदार्थ, दुग्ध पदार्थ, खाद्यतेले, आदीची मोठ्या प्रमाणात मागणी होत असते. खाद्यपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होण्याची शक्यता असते. भेसळयुक्त पदार्थामुळे मानवी आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. भेसळ युक्त व निकृष्ट खाद्यपदार्थ विक्री होणार नाहीत याबाबत प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड जिल्हा यांच्याकडून निवेदनाद्वारे निवेदनाद्वारे मा. जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे करण्यात आली होती. त्याची दखल प्रशासनाने तात्काळ घेऊन जिल्हात सणासुदीच्या काळात तपासणी मोहीम राबविण्यात आली होती. अन्न औषध प्रशासनाने त्या कालावधीत विविध एकूण (६३) नमुन्याची तपासणी केल्याचे पत्र बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्याकडे प्राप्त झाले आहे. त्यापैकी (५२) तपासणी अहवाल अद्याप पर्यंत तपासणीसाठी प्रलंबित आहेत. सदरील अहवाल प्राप्त होतात संबंधितावर आसुमाका कायद्या अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये देखील कार्यवाही करण्यात येईल. आपल्या निवेदनानुसार कामकाज नियमितपणे करण्यात येत आहे. यापुढे देखील खाद्यपदार्थ यांची दरमहा तपासणी करण्यात येणार आहे असे मा. श्री अ. ज्ञा. भोसले अन्न सुरक्षा अधिकारी( अन्न औषध प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन बीड) सहाय्यक आयुक्त यांनी शासकीय पत्रकाद्वारे कळविले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व खाद्यपदार्थ व दुग्ध पदार्थ, आधी पदार्थ विक्री करणाऱ्या सर्व दुकानदार यांनी भेसळ युक्त निकृष्ट खाद्यपदार्थ ग्राहकांना विक्री होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी असे आवहान बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी या पत्राद्वारे केले आहे.

# भक्तराज कदम यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२० जानेवारी**



तालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ नागरिक,सेवानिवृत्त कृषी सहाय्यक भक्तराज मोहन कदम वय ७० वर्ष यांचे सोमवार रोजी (दि १९) सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर कदम वस्ती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना दोन मुले, मुलगी, सून नातवंडे असा परिवार आहे. ते उद्योजक रवी कदम यांचे वडील होत.

# बौद्धिक संपदा अधिकार,पेटंट आणि डिझाईन या विषयावर ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.२० जानेवारी**





जयभवानी महाविद्यालय पाटोदा आणि बलभीम महाविद्यालय बीड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक संपदा अधिकार, पेटंट आणि डिझाईन फायलिंग या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली.या कार्यशाळेचा उद्देश बौद्धिक संपदा हक्कांबाबत जनजागृती करणे हा होता.या कार्यशाळेमध्ये राजीव गांधी राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार व्यवस्थापन संस्था नागपूर येथील सहाय्यक संचालक श्री. कुमार राजू यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये त्यांनी IPR, पेटंट, औद्योगिक रचना (Industrial Designs), ट्रेडमार्क, भौगोलिक संकेतांक (Geographical Indication) आणि कॉपीराइट या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी कायदेशीर बाबी सोप्या भाषेत मांडल्या. या कार्यशाळेचे अध्यक्ष बलभीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संतोष उंदरे सर हे होते. या कार्यशाळेमध्ये प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे सर, उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब कोकाटे सर, आक्यूएसी समन्वयक प्रा. विनोद किर्दक यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे सूत्रसंचलन आक्यूएसी समन्वयक डॉ. अनिल चिंधे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. सोमेश्वर बाबर यांनी केले.पाहुण्याचा परिचय डॉ. गोवर्धन वायसे यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. शिवाजी काकडे यांनी मानले. या कार्यशाळेमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रश्नोत्तर सत्रामुळे सहभागींच्या शंका निरसनास मदत झाली. अशारीतीने ही कार्यशाळा नवकल्पना व संशोधनाला चालना देणारी ठरली.

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची वॉलस्टार टेक्नॉलॉजी येथे औद्योगिक भेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० जानेवारी**

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक बीड येथील कंप्युटर सायन्स अँड इंजिनीअरिंग विभागाच्या द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी १७ जानेवारी २०२६ रोजी वॉलस्टार टेक्नॉलॉजी प्रा.ली., कोल्हापूर या नामांकित आयटी सॉफ्टवेअर कंपनीस औद्योगिक भेट दिली. या भेटीत ४१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यांना आयटी उद्योगातील प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली. या भेटीचे आदित्य पॉलिटेक्निक व वॉलस्टार टेक्नॉलॉजी यांच्यात सामंजस्य करार झाल्याने विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, प्रोजेक्ट डेव्हलपमेंटची प्रक्रिया आणि व्यावसायिक वातावरणाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली. वेब व मोबाईल प्लिकेशन तयार करताना कोणत्या टप्प्यांतून काम केले जाते, टीमवर्क कसे असते आणि ग्राहकांच्या गरजेनुसार सोल्युशन कसे विकसित केले जाते, याची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे समजावून सांगण्यात आली.

# नियोजन समितीच्या बैठकीत २७९ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता

## पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण आणि विशेष घटक, आदिवासी उपयोजना अशा एकूण जिल्हा वार्षिक सन २०२६-२७ च्या २७८ कोटी ९५ लाख रूपयांच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, आ. चंद्रकांत नवघरे, प्रधान सचिव रिचा बागला, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलिस अधीक्षक नीलभ रोहन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी जी जी चितळे, प्रदीप नळगीरकर यांच्यासह विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा वार्षिक योजनेमध्ये सन २०२५-२६ या चालू वर्षात डिसेंबर २०२५ अखेर झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ साठीच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली.

यामध्ये सर्वसाधारण योजना २०१.६६ कोटी, अनुसूचीत जाती उपयोजना ५४ कोटी, आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना २३.७९ कोटी अशा एकूण शासनाने ठरवून दिलेल्या कमाल मर्यादेत २७८ कौअी ९५ लाख रूपयांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. जिल्हा वार्षिक योजनेमध्ये सर्व कार्यान्वयीन यंत्रणेकडून ५८३ कोटी ४५ लाख रूपयांची अतिरिक्त मागणी करण्यात आली आहे. यावेळी पुनर्विनियोजन प्रस्ताव, क वर्ग तीर्थक्षेत्र मान्यतेस्तव प्राप्त प्रस्ताव आणि डोंगरी विकास कार्यक्रम २०२५-२६ च्या आराखड्यावर यावेळी चर्चा करण्यात आली.

आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मुख्यमंत्री पाणंद रस्ते निर्मितीसाठी वाढीव निधीची मागणी केली असून हे रस्ते झाल्यास त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल त्यामुळे याकडे लक्ष देण्याची मागणी तसेच चिराहशाह तलावातील गाळ काढून त्याचे पुनरूज्जीवन करण्याचीही मागणी केली. आ. चंद्रकांत नवघरे यांनी रस्ते, सती पांगरा येथील तलाव दुरूस्ती आणि सुशोभिकरण करण्याची मागणी केली. या बैठकीत ऐनवेळी आलेल्या विषयांवरही चर्चा करण्यात आली. पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी आगामी बैठकीत चर्चा करण्यात येईल असे सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रारूप आराखड्याचे सादरीकरण केले.

# रस्ते अपघात टाळण्यासाठी नियमांचे काटेकोरपणे पालन करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे रस्ता सुरक्षा सप्ताहावेळी आवाहन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**

दैनंदिन होणारे रस्ते अपघात टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी येथे केले.

वाहन अपघातांना आळा बसावा तसेच नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते. यावर्षी 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६' परिवहन विभागामार्फत राबविण्यात येत असून, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते चित्ररथाची फित कापून अभियानाचा प्रारंभ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आज करण्यात आला.

यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, मोटर वाहन निरीक्षक आशिक तडवी, दिपक ढाकणे, अतुल बानापुरे, चंद्रक्रीर्ती टिपले, आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी रस्ते अपघात कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचना दिल्या. दैनंदिन होणाऱ्या रस्ते अपघातांवर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच नागरिकांनी वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

या कार्यक्रमास उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांनी रस्ते सुरक्षा अभियानाबाबत माहिती दिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'स्कूल बस धोरण २०११ शालेय वाहतूक नियमावली व रस्ता सुखाचा या पुस्तकांचे विमोचन करण्यात आले.

# लाडकी बहिण लाभार्थींनी अचूक माहीती भरून द्यावी- राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**

जिल्ह्यातील लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थीनी महिला व बालविकास विभागात पुन्हा एकदा दिलेल्या फॉर्ममध्ये अचून माहीती भरून द्यावी, या लाभार्थी महिलांना लाभ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर आम्ही प्रयत्न करणार असल्याची माहीती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली आहे.



सोमवारी लाडकी बहिणी योजनेचा लाभ मिळत नसल्यामुळे शेकडो महिला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या दालनात भेटीसाठी गेल्या होत्या. या महिलांना मागील काही महिन्यांपासून अर्ज भरूनही लाभ मिळत नसल्याची त्यांनी तक्रार केली होती. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी महिलांशी संवाद साधला तसेच काही महिलांनी लाडकी बहिण योजनेचा फॉर्म भरतांना काही चुका केल्या असल्यामुळे त्या लाभापासून वंचीत राहत असल्याचे सांगितीले परंतु या लाभार्थी महिलांनी काळजी न करता महिला व बालविकास विभागात पुन्हा एकदा मोबाईल क्रमांक, नाव व ओळखपत्र सादर करावे असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

त्यानंतर महिलांनी महिला व बालविकास विभागात जाऊन त्यांचे फॉर्म भरण्यास सुरूवात केली असल्याचे दिसत आहे.



**हिंगोली- शहरातील रामलीला मैदानात लाखो रूपये खर्च करून संरक्षण भिंत तसेच मैदानात नागरिकांना मॉर्निंग वॉकसाठी वॉकींग ट्रॅक तयार केले आहे परंतु मागील काही महिन्यांपासून या मैदानाची दुरावस्था झाली असून जागोजागी खड्डे पडले असून कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना वॉकींगसाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### नागनाथ मंदिरात शाळांच्या सहली



हिंगोली- येथील आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूच्या दर्शनासाठी मराठवाड्यासह हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर, बीड, वाशीम, रिसोड, पुसद आदी भागांमधून मोठ्या प्रमाणात शाळेच्या सहली येत आहेत. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिंगणी येथील विद्यार्थ्यांची सहल नागनाथ मंदिरात आली. सर्व चिमुकल्या विद्यार्थ्यांनी प्रभू नागनाथाचे दर्शन घेतले. दर्शन झाल्यानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नागनाथ मंदिराविषयी माहिती सांगितली. औंढा नागनाथ नगरीमध्ये शाळेच्या सहली येत असल्यामुळे विद्यार्थ्यांची वर्दळ दिसून येत आहे. नागनाथ प्रभूचे दर्शन घेऊन मंदिराच्या जवळच असलेल्या नागनाथ उद्यानामध्ये सहली जात आहेत. नागनाथ उद्यानामध्ये विद्यार्थ्यांना पॅगोडा, खेळाचे मैदान, महापुरुषांचे माहिती फलक वेगवेगळ्या प्राण्यांचे पुतळे, वेगवेगळी खेळणे तसेच वेगवेगळ्या प्रकारची झाडे याची माहिती दिली जात आहे. तसेच त्यानंतर सर्व मुले जेवणाचा डबा खाऊन नागनाथ उद्यानाचा आनंद घेत आहेत.

### प्रभाग क्र ३ मध्ये कामांचे भूमीपूजन



हिंगोली- हिंगोली नगरपरिषद प्रभाग क्रमांक ३ येथे डीपीडीसी अंतर्गत एक कोटी कामाचे भूमिपूजन न प गटनेते श्रीराम बांगर, नगरसेवक नाना नायक नगरसेवक नितीन बापूराव बांगर, नगरसेवक कपिल खंडेलवाल, माजी नगरसेवक बिरजू भैय्या यादवयांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सारडा, दीपक सोनवणे, कैलाश डिडाळे, श्याम लोलगे, राजू यादव, संतोष डहाळे, सचिन डहाळे, पिंटू डहाळे, प्रवीण डहाळे, रितिक डहाळे, सचिन निधानकर, संदीप डहाळे, विशाल अग्रवाल, सोहन डहाळे, सचिन होकर्णे, अभिषेक डिडाळे डॉ.अजय अग्रवाल, चंद्रशेखर राठोड, सुरेश डहाळे, गणेशभाऊ लोलगे, सतीश दहीवाल, सुरेश धूत, अशोक जोशी, सुबूरखा पठाण, बलराम चौधरी, नागेश बांगर, राजू नागरे, किरणभाऊ डहाळे, कुलदीप मास्ट आदींची उपस्थिती होती.

XA

# हिंद दी चादर कार्यक्रमासाठी हिंगोलीच्या व्यापाऱ्यांचे भरीव योगदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**

नांदेड येथे आयोजित हिंद दी चादर श्रीगुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी व्यापारी व उद्योजकांनी स्वयंस्फूर्तीने भरीव मदत देण्याची घोषणा केली.

हिंगोली येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवाड, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, अनिल कदम, डॉ बालाजी भाकरे, डी सी नांदे, एस सी सावजी यांच्यासह व्यापारी महासंघाचे पदाधिकारी नंदकिशोर तोष्णीवाल, पंकज अग्रवाल, ज्ञानेश्वर मामडे, रमेश पंडीत, राजेश जयस्वाल, प्रवीण सोनी, द्वारकादास सारडा, संदीप राठोड, डिगांबर चव्हाण, श्रीरंग राबडे, सुधीर राठोड, राजेश बगडीया आदींची उपस्थिती होर्ती.

नांदेड येथे दि २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या हिंद दी चादर या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी संघटना व नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे विविध स्वरूपात भरीव योगदान देण्याची तयारी दर्शवली आहे. या बैठकीत जिल्हाधिकारी गुप्ता यांच्याकडून ५हजार बिस्कीट पुडे देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. तर व्यापारी व उद्योजकांकडून टुथपेस्ट, टुथब्रश, साबण, पॅराशुट तेल व कंगवा यांचा समावेश असलेली २हजार किट व २० क्विंटल साखर तसेच संस्कार सिनेमा कडून कार्यक्रमाच्या प्रसिध्दीसाठी सहकार्य मिळणार आहे. उद्योग संघटनेकडून १० क्विंटल तेल, दिड क्विंटल पोहे, ३० क्विंटल गहू, ५ क्विंटल तांदुळ, याशिवाय डिस्पोझल ग्लास, वाट्या, चमचे, प्लेटस देण्यात येणार आहे. कळमनुरीच्या व्यापाऱ्याकडून ५ क्विंटल तुरदाळ, १० क्विंटल साखर देण्याचे ठरले

# जि. प. कन्या प्रशालेतील विद्यार्थीनींचा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**



हिंगोली गुरु तेग बहादुर साहेबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त 'हिंद दी चादर' या उपक्रमाअंतर्गत जिल्हा परिषद हिंगोली शिक्षण विभागाच्यावतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये जिल्हा परिषद कन्या प्रशाला, हिंगोली येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धांमध्ये गायन स्पर्धेत कुमारी विद्या भगत हिने प्रथम क्रमांक पटकावला तर निबंध स्पर्धेत कुमारी अर्चना पाईकराव हिने प्रथम क्रमांक मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या यशस्वी विद्यार्थिनींचा गौरव जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संदीपकुमार सोनटक्के व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती आसावरी काळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षीस देऊन करण्यात आला.विद्यार्थिनींना या यशासाठी शारीरिक शिक्षक घेणेकर एम. बी. यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक रामप्रकाश व्यवहारे, मार्गदर्शक व वर्गशिक्षक यांचे आणि यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कावरखे, नाईक ताई, श्रीरामे, देशमुख, अतुल छत्रपती, हनवते, श्रीमती राठोड, श्रीमती ताजने यांनीही विद्यार्थिनींचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या यशामुळे जिल्हा परिषद कन्या प्रशाला, हिंगोली शाळेची शैक्षणिक व सांस्कृतिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# चळवळीतून सर्वसामान्य माणूस उभा राहीला पाहीजे- प्रा. मुकुंद भारसाकळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**




भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या विचारावर अल्पकालीन चळवळ, मध्यमकालीन चळवळ व दीर्घकालीन चळवळीचे कार्य सध्या सुरू आहे. या सर्व चळवळीमधून समाजाचे प्रबोधन होऊन समाज जागृत झाला. चळवळकर्त्यांकडून बाबासाहेबांच्या कार्यावर केवळ प्रस्तावनाच सुरू आहे अशी खंत व्यक्त करून समाज चळवळीतून सर्वसामान्य माणूस स्वतःच्या पायावर उभा राहीला पाहीजे असे मत व्याख्याते प्रा. मुकुंद भारसाकळे यांनी व्यक्त केले.

शहरातील महावीर भवन येथे भारतत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प सोमवारी गुंफण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य विलास आघाव, अप्पर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक शोभाताई कळासरे, ज्योतीताई बलखंडे, रवींद्र वाढे यांचा मान्यवरांच्याहस्ते संविधानाची प्रत, स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पुढे बोलतांना प्रा भारसाकळे म्हणाले की, कमाईतील २० टक्के हिस्सा समाजासाठी द्यावा अशी बाबासाहेबांची अपेक्षा होती. त्यातून समाजाचा सर्वांगीण विकास झाला असता असे सांगून कायद्यापेखा समजदारी मोठी आहे हे स्पष्ट करून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आरक्षणाचा लाभ घेतलेल्या शिक्षित लोकांनी कमाईचा २० टक्के हिस्सा समाजासाठी खर्च करण्याचे आवाहन केले. जमिनीवर उभे राहून बाबासाहेबांची चळवळ केली पाहीजे असा उपदेश करतांना त्यांनी बौध्द समाजाएवढा आदर्श समाज देशभरात अनत्र कोणताही नाही असे स्वाभिमानाने सांगितले.

अध्यक्षीय समारोपात बोलतांना प्राचार्य आघाव म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील सर्वोत्तम राज्यघटना तयार करून त्यामध्ये दलीत, पीडीत, उपेक्षित, मागासवर्गीय प्रवर्गाचे प्रतिनिधीत्व समाविष्ट करण्याचे कार्य केले.

# वाहतुक शाखेकडून रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० जानेवारी**

येथील शहर वाहतुक पोलिस विभागाच्यावतीने दि १९जानेवारी रोजी रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त चालकांना नियमांचे व सुरक्षसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी पोलिस निरीक्षक शरद मळे, उपनिरीक्षक घुमनर, जमादार शिवाजी पारसकर, गजानन राठोड, दांडेकर यांच्यासह चालकांची उपस्थिती होती. यावेळी पोलिस निरीक्षक शरद मळे यांनी वाहन चालकांना दारू पिऊन वाहन न चालवणे, रस्त्याच्या बाजूला वाहने उभी करावीत, अतिवेगात वाहने चालवू नयेत, वाहतुकीची कोंडी टाळावी, वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे आणि सुरक्षित रहावे आदीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने वाहन चालक संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहीदी समागम कार्यक्रम जागतिक स्तरावर नेण्यासाठी समन्वयाने काम करा : राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**जिमाका वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २० जानेवारी-**

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम नांदेडपुरता मर्यादित न राहता जागतिक स्तरावर पोहोचावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने, काटेकोर नियोजनासह जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

नांदेड येथे होणाऱ्या या शताब्दी वर्ष कार्यक्रमाच्या आयोजनाचा राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स) सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, विभागीय माहिती उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.



राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, कार्यक्रमस्थळी पुरेसे पिण्याचे पाणी, स्वच्छ व पर्याप्त शौचालय व्यवस्था सुनिश्चित करण्यात यावी. कार्यक्रमाची प्रचारप्रसिद्धी व्यापक प्रमाणात करण्यात यावी. स्थानिक स्तरावर होणाऱ्या उपक्रमांमध्ये लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आवश्यक असून सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व मुद्रित माध्यमांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जावी, असेही त्यांनी निर्देश दिले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती व प्रेरणा निर्माण व्हावी, यासाठी शाळा स्तरावर निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करून त्याची माहिती पोर्टलवर अपलोड करावी. तसेच सिनेमागृहांमध्ये भक्तिगीत प्रसारित करणे, प्रत्येक जिल्ह्यात होर्डिंग्ज लावून कार्यक्रमाचा संदेश पोहोचवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यक्रमास महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना सहज सहभागी होता यावे, यासाठी पार्किंग क्षेत्रापासून कार्यक्रमस्थळापर्यंत योग्य वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देशही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

**'हिंद दी चादर' कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले**

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी असरजन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५२ एकर मैदानावर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मंत्री, संत-महात्मे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.


कार्यक्रमाच्या अनुषंगाने मैदानावर युद्धपातळीवर काम सुरू असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून, मैदानालगत दोन भव्य टेन्ट सिटी उभारण्यात आल्या आहेत. एका टेन्ट सिटीत सुमारे १४ हजार भाविकांची निवास क्षमता असून, यासोबतच शहरातील मंगल कार्यालये व शाळांमध्येही निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

कार्यक्रमस्थळी स्वच्छता, स्वयंसेवक व्यवस्था, विविध प्रकारचे मोफत सेवा स्टॉल्स, तसेच मोठ्या प्रमाणात वैद्यकीय सेवा नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये ५० हजार नेत्र तपासणी व विशेष कर्करोग तपासणी स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. भाविकांसाठी भव्य लंगर व्यवस्था करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे १० लाख भाविकांना घेता येणार आहे. निवास, भोजन, वाहतूक, आरोग्य व सुरक्षा याबाबत सर्व विभाग समन्वयाने काम करीत असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आतापर्यंत करण्यात आलेल्या व पुढील कालावधीत राबविण्यात येणाऱ्या प्रचारप्रसिद्धी उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली.

# आदिलाबाद मार्गावर डीआरएम प्रदीप कामले यांचा पाहणी दौरा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २० जानेवारी-**

नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. प्रदीप कामले यांनी मंगळवारी नांदेड-आदिलाबाद- नांदेड असा विशेष निरीक्षण दौरा केला. या दौऱ्यात रेल्वे सुरक्षितता, पायाभूत सुविधा व प्रवासी सुविधांशी संबंधित कामांची सविस्तर पाहणी करण्यात आली.



नांदेड ते आदिलाबाद दरम्यान रेयर विंडो निरीक्षण करण्यात आले. किमी ३/२३ येथील लेव्हल क्रॉसिंग क्रमांक १ (नॉन-इंटरलॉक्ड) ची तपासणी करण्यात आली. अमृत भारत योजनेअंतर्गत मुदखेड, भोकर, हिमायतनगर, किनवट व आदिलाबाद रेल्वे स्थानकांची सविस्तर पाहणी करण्यात आली.

यासोबतच किमी ५६/२ येथील वळण क्रमांक ४, हिमायतनगर रेल्वे स्थानकाजवळील किमी ५८/१२ येथील पॉईंट क्रमांक १४-B तसेच किमी १५३/४१५३/५ येथील स्टील गर्डर पूल क्रमांक १८० यांची पाहणी करण्यात आली.

विद्युत विभागाशी संबंधित कामांची तपासणी करताना अंबारी येथील ओव्हरहेड इक्विपमेंट डेपो तसेच किमी १३८/५६ येथील लेव्हल क्रॉसिंग क्रमांक १९ ऐवजी उभारण्यात आलेल्या रोड अंडर ब्रिज क्रमांक १७१- ची पाहणी करण्यात आली. किमी १४६/३४ येथील लेव्हल क्रॉसिंग क्रमांक २३ व किमी १५५/५६ येथील लेव्हल क्रॉसिंग क्रमांक २७ (नॉन-इंटरलॉक्ड) चीही तपासणी करण्यात आली.

आदिलाबाद येथे क्रू लॉबी, रनिंग रूम व पिट लाईनची पाहणी करताना कामले यांनी अधिकाऱ्यांना सुरक्षितता नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या तसेच प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. या दौऱ्यात नांदेड विभागातील वरिष्ठ विभागीय अधिकारी उपस्थित होते.

# माहूर येथे व्यापारी संकुल व वाहनतळासाठी २० कोटींचा निधी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. २० जानेवारी-**

केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२५-२६ या प्रस्तावित योजनेंतर्गत माहूर नगरपंचायत अंतर्गत मंजूर विकास आराखड्यानुसार शहरातील 'व्यापारी संकुल व वाहनतळ विकसित करणे' यासाठी तब्बल १९ कोटी ७६ लाख ३१ हजार रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लाडके भाऊ समजले जाणारे आ. भीमराव केराम यांनी याकामी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला मिळालेले हे मोठे यश असल्याचे राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे.



केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास निधी प्राप्त होत आहे. या योजनेंतर्गत प्रामुख्याने विविध नगरपरिषद /नगरपंचायत यांच्या विकास योजना आराखड्यातील कामांना निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सन २०२४-२५ च्या प्रस्तावित निधीतून सदर योजना राबविण्यासाठी विभागीय सह संचालक, नगर रचना, कार्यालयाच्या स्तरावरून विहित कार्यपद्धती अवलंबून योजनेंतर्गत प्रकल्पांकरिता वास्तुविशारद संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. सदर वास्तुविशारद संस्थेमार्फत तयार करण्यात आलेल्या प्रस्तावित विकास कामांच्या नकाशांना संबंधित सह संचालक, नगर रचना/सहायक संचालक, नगर रचना यांचे स्तरावरून मंजुरी देण्यात आली आहे. वास्तुविशारद संस्थेकडून उक्त प्रकल्पांतर्गतच्या विकास कामांची अंदाजपत्रके तयार करून, त्यांना तांत्रिक मंजुरी मिळण्यासाठीचे प्रस्ताव, संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित कार्यालय किंवा संचालक, उपवने व उद्याने यांचेकडे सादर करुन, अशा विकास कामांच्या अंदाजपत्रकांना, तांत्रिक मंजुरी प्राप्त करुन घेतल्या आहेत. केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२५-२६ या प्रस्तावित योजनेंतर्गत संचालक, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पुणे यांचेकडून प्राप्त नगरपरिषद / नगरपंचायत माहूर, नरखेड, मोवाड, काटोल, हिंगोली, सेनगाव, घाटंजी, लोणावळा, , किनवट, उदगीर, गंगाखेड, महाबळेश्वर, गंगापूर, गोंदिया व बाळापूर यांच्या विकास योजना आराखड्यातील कामांना दिलेल्या तांत्रिक मान्यतेस अनुसरुन प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअंतर्गत केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२५-२६ या प्रस्तावित योजनेंतर्गत माहूर नगरपंचायतसह राज्यातील १५ नगरपरिषद / नगरपंचायत विकास योजना आराखड्यातील रु.३८१ कोटी ३ लाख १ हजार १८१/- च्या कामांना संबंधित विभागाने दिलेल्या तांत्रिक मान्यतेस अनुसरुन या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

या योजनेतून माहूर नगरपंचायत अंतर्गत मंजूर विकास आराखड्यानुसार आरक्षण क्र. १९ शहरात व्यापारी संकुल व वाहनतळ विकसित करणे या कामासाठी १९ कोटी ६६ लाख ३१ हजार रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

माहूर येथे आरक्षण क्र. १९ याठिकाणी व्यापारी संकुल व वाहनतळ विकसित करण्याचे काम होणार असल्याने एकाच ठिकाणी अनेक दुकाने (व्यापारी संकुल) आणि गाड्यांसाठी पार्किंगची (वाहनतळ) सोय असलेली मोठी व्यावसायिक जागा तयार करण्यात येणार आहे. जिथे आधुनिक सुविधा असतील; ज्यामुळे ग्राहकांना खरेदीसाठी आणि वाहनांच्या पार्किंगसाठी सोयीस्कर ठिकाण मिळणार असल्याने वाहतूक कोंडी कमी होणार आहे, असे हे एकात्मिक नियोजन असणार आहे.

एका मोठ्या इमारतीत किंवा परिसरात होऊ घातलेल्या या व्यापारी संकुलात अनेक व्यावसायिक दुकाने, मॉल्स, कार्यालये इत्यादींचा समावेश असणार आहे.येथे ग्राहकांना विविध वस्तू आणि सेवा एकाच ठिकाणी मिळणार आहेत. तर वाहनतळावर वाहने (गाड्या, दुचाकी) पार्क करण्यासाठी प्रशस्त जागा उपलब्ध असणार आहे. ज्याचा उपयोग व्यापारी संकुलात येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनांच्या सोयीसाठी होणार आहे. विशेष म्हणजे माहूर शहरात विकसित करण्यात येणाऱ्या व्यापारी संकुल व वाहनतळामुळे ग्राहकांना एकाच ठिकाणी सर्व सोयी मिळणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे कारण वाहने एकाच ठिकाणी पार्क करता येणार आहे. यामुळे शहराच्या विकासाला चालना मिळणार असून व्यावसायिक वातावरण सुधारणार आहे.एकाच जागेत व्यापार आणि पार्किंगची सोय असल्याने पायाभूत सुविधांचा योग्य वापर होणार आहे. म्हणजेच आता लवकरच माहूर शहरात व्यापारी संकुल व वाहनतळ विकसित करण्याचे काम सुरू करुन ग्राहकांना खरेदीचा आणि वाहनांच्या पार्किंगचा चांगला अनुभव देण्यासाठी एक सुनियोजित व्यावसायिक जागा तयार करण्यात येणार आहे.

शासनाच्या या विकासात्मक निर्णयाबद्दल आमदार भीमराव केराम यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसह नगरविकास मंत्री यांचे विशेष आभार व्यक्त केले आहे,तर भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक गोपू महामुने यांनी आमदार भीमराव केराम यांचे शहरवासियांच्यावतीने आभार मानले असून, व्यावसायिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांना संत तुकाराम' पुरस्कार जाहीर

**लोहा**-प्राचार्य वसंत बिरादार पाटील महात्मा फुले महाविद्यालय यांना महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीरच्या मराठी विभागाकडून देण्यात येणारा यंदाचा 'संत तुकाराम पुरस्कार' जाहीर झाला आहे



.हा पुरस्काराचे वितरण उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात २३ जानेवारी २६ रोजी होणार आहे. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे दरवर्षी माजी विद्यार्थ्यांपैकी एकाला, त्यांच्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन 'जगद्गुरु संत तुकाराम' महाराजांच्या नावाने पुरस्कार देऊन गौरविले जाते. या पुरस्काराचे चौथे वर्ष आहे, २०२६ चा मानाचा पुरस्कार अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य तथा लेखक, समीक्षक, जेष्ठ पत्रकार, कथा- कादंबरीकार प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांना जाहीर केल्याचे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, संयोजक मराठी विभाग प्रमुख डॉ. दीपक चिद्दरवार यांनी कळविले आहे. येत्या २३ जानेवारी रोजी उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात समारंभपूर्वक, मान्यवरांच्या हस्ते प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांना 'संत तुकाराम पुरस्कार ' देऊन गौरविण्यात येणार आहे, असे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के व डॉ. दीपक चिद्दरवार यांनी कळविले आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी. टी. शिंदे यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच महात्मा फुले महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## समाजाच्या प्रगतीच्या उद्देशाने 'सुधारणेच्या वाटेवर' ग्रंथाची निर्मिती :प्रा. डॉ. चव्हाण

**मुदखेड** - उषा नारायणराव गैनवाड या सुधारणावादी लेखिका असून समाजातील व विशेषतः महिलावर्गातील अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी त्या प्रयत्नशील असतात. याच समाजविकासाच्या ध्यासातून त्यांनी 'सुधारणेच्या वाटेवर' या ग्रंथाची निर्मिती केली आहे असे प्रतिपादन समीक्षक प्रा. डॉ. कमलाकर चव्हाण यांनी केले. इसाप प्रकाशनातर्फे प्रकाशनासाठी सिद्ध केलेल्या व उषाताई गैनवाड लिखित 'सुधारणेच्या वाटेवर' या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. नारायण शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. कमलाकर चव्हाण, प्रा. डॉ. एम. आर. जाधव, केशवराव कदम, डॉ. शिवानंद धामणे ,नामदेव एडके उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक प्रकाशक दत्ता डांगे यांनी केले. यानंतर डॉ. कमलाकर चव्हाण यांच्या हस्ते 'सुधारणेच्या वाटेवर' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. लेखिका उषाताई गैनवाड यांनी आपल्या मनोगतातून आपण सावित्रीबाई फुले यांचा समाजसुधारणेचा वारसा पुढे नेत असल्याचे सांगितले. तसेच पुस्तक निर्मितीबाबतचे आपले विचार व्यक्त केले. प्रा. एम. आर. जाधव आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, उषाताई गैनवाड यांनी आपल्या भूमिकेशी प्रामाणिक राहत या पुस्तकाचे लेखन केले आहे. महापुरुषांविषयीही यात कृतज्ञता व्यक्त केली. तसेच आस्तिक किंवा नास्तिक यात न पडता लेखिकेने वास्तविकतेचा मार्ग निवडला आहे. महिलांना कर्मकांडातून बाहेर पडण्याचे मार्गदर्शन या पुस्तकातून त्यांनी केलेले आहे. यासाठी त्या कटिबद्धही आहेत. त्यांची लेखनशैली संवादी आहे असेही त्यांनी सांगितले. अध्यक्ष प्रा. नारायण शिंदे यांनी म्हटले की, लेखिकेने वास्तव लिहिण्याचे धाडस केले आहे. त्यांचे लिखाण हे 'अत्त दीप भव' याप्रमाणे उजेडाचा मार्ग दाखविणारे आहे. अंधश्रद्धा दूर करण्याच्या उद्देशाने हे पुस्तक लिहिल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा अवमान सहन करणार नाही : खा. रवींद्र चव्हाण



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २० जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या वाराणसी उत्तरप्रदेश येथील ऐतिहासिक मनकर्णिका घाटाची भाजपा सरकारने केलेल्या तोडफोडीतून, बहुजन महापुरुषांचे कार्य पुसण्याची भाजपाची मुळ भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे. मात्र पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा अवमान आम्ही कदापी सहन करणार नाही असे प्रतिपादन खा. रवींद्र चव्हाण यांनी केले.

उत्तरप्रदेश भाजपा सरकारने विकासाच्या नावाखाली वाराणसी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या मनकर्णिका घाटाची तोडफोड केल्याच्या निषेधार्थ काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल पावडे यांनी मंगळवार (ता.२०) रोजी शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नियोजित स्मारकाच्या ठिकाणी निषेध आंदोलन आयोजित केले होते यावेळी ते बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या अवमान सहन करण्यापलीकडचा आहे. भाजपा सरकार केव्हाच हिंदूचे सरकार नव्हते ते भांडवलदारांचे सरकार आहे, यामुळेच शंकराचार्यांना आज उपोषणाला बसण्याची वेळ येणे ही हिंदू समाजासाठी शोकांतिका आहे, असे प्रतिपादन प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे यांनी केले. यावेळी प्रदेश सचिव डॉ. श्रावण रँपनवाड, बालाजी गाढे पाटील, नगरसेवक सत्यपाल सावंत, केदार पाटील सांळूखे, महेश देशमुख तरोडेकर, विठ्ठल पावडे, संभाजी धुलगंडे, रामचंद्र भंराडे, मुन्ना अब्बास, सुरेश हाटकर, ललिता कुंभार, सुरज शिंदे, अभिलाष पावडे, माधवराव पवळे, अनिल पाटील चिमेगावकर, बापूसाहेब पाटील, अंबादास रातोळे, मुख्तार शेख, अजहर शेख, गजानन सरोदे, विमलताई किर्तने, जेशिका शिंदे, बाळू पाटील, रिहान भाई, रवींद्र डडाळे, आदीसह काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिव्यांगतेवर मात करत कलागुणांचा उत्सव ; नांदेडमध्ये भव्य सांस्कृतिक कार्यक्रम

**जिममाका वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २० जानेवारी-**

दिव्यांग कल्याण आयुक्तालय, जिल्हा परिषद नांदेड व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त नांदेड येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात भव्य व प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्ह्यातील सुमारे ५८ मुकबधीर, अंध, मतिमंद व अपंग विद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे सशक्त दर्शन घडविले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महान समाजसुधारिका हेलन केलर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, सहाय्यक संचालक दिनकर नाठे, अधिक्षक बळीराम येरपूलवार, माजी प्राचार्य पंजाबराव अंभोरे, डॉ. सान्वी जेठवाणी, भार्गवी देशमुख, सुधीर फुसांडे, रमेश वडगावकर, सीएम फेलो भार्गवी मुंढे, अर्थव मुळक, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, शुभम तेलेवार, जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे, साईचरण मुगावे आदी मान्यवर उपस्थित होते.

'गाडी झुमक्याची', 'शेतकरी नृत्य', 'चला जेजुरीला जाऊ', 'राधे-राधे', 'मल्हारी मिक्स', 'दैवत छत्रपती', 'दोनच राजे इथे गाजले', 'काठी न घोंगड घेऊद्या की', 'राणू मुंबई की राणू', 'आदिवासी ठेमसा', 'आया रे तुफान-छावा', 'रिमिक्स जलवा', 'माऊली-माऊली' तसेच गरीब मुलांच्या शिक्षणासाठीच्या संघर्षावर आधारित सादरीकरण, भावगीत, लावणी व गीतगायन अशा विविध सादरीकरणांना उपस्थितांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

## पदमीनबाई तुमवाड यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**नरसी, दि. २० जानेवारी-**


नायगाव तालुक्यातील सुजलेगाव येथील सेवानिवृत्त अंगणवाडी शिक्षिका, मायेचा पदर पसरवणाऱ्या आणि कर्तव्यनिष्ठ सेवेसाठी ओळखल्या जाणाऱ्या पद्ममिनबाई दिगंबर तुमवाड यांचे दीर्घ आजाराने दि. १९ रोजी रात्री ११.५० वाजता निधन झाले.



सुप्रसिद्ध शाहिर दिगु तुमवाड यांच्या त्या सहचारिणी होत. आज दि. २० रोजी दुपारी ३ वाजता सुजलेगाव येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, पाच मुली, दोन मुले, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या विचारवंत दत्ता तुमवाड यांच्या वहिनी होत. त्यांच्या मायेची, संयमाची आणि सेवाभावाची आठवण कायम सर्वांच्या हृदयात राहील. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे.

## दुर्गादासराव तुळजापुरकर यांचे निधन

**भोकर**- संभाजीनगर, टिळक कॉलनीतील रहिवासी (सद्य स्थित हैदराबाद,) दुर्गादासराव तुळजापुरकर (७३) यांचे दि.२० जानेवारी रोजी रात्री १२:५५ वा. अल्पशा आजाराने निधन झाले, हैदराबाद येथील खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा,२ मुली,जावई,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर हैदराबाद येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मंगेश तुळजापूर यांचे ते वडील होत.भोकर येथील पत्रकार श्रीकांत देव यांचे ते सासरे होत.



**कागदपत्रे हरवली आहेत**

माझे विजय विश्वांभर जोशी या नावाचे कागदपत्रे ज्यात पत्रकार सहवास सोसायटी शेअर सर्टीफिकेट व अन्य महत्वाचे कागदपत्रे १७ जानेवारी २०२६ रोजी आयटीआय ते शिवाजी नगर मार्गावर हरवले आहेत. कुणास सापडल्यास खालील पत्तयावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**
**पत्रकार सहवास को. ऑप.हाऊसिंग सोसायटी लि. नांदेड**
**मो.९९२३००१२३**

# देगलूर भाजी मार्केट परिसरात तातडीची स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. २० जानेवारी-**

भिंतीवर स्वच्छता सर्वेक्षणाची ब्रॅण्डिंग, जमिनीवर मात्र घाणीचे साम्राज्य या मथळ्याखाली दै. तरुण भारतने दि. १८ जानेवारी रोजी बातमी प्रसिद्ध करुन शहरातील स्वच्छतेची विदारक परिस्थिती उघड केली. त्यानंतर प्रशासनाकडून तातडीने स्वच्छतेला सुरुवात केली. विशेषतः मुख्याधिकारी निलम कांबळे यांच्याकडून स्वच्छता निरीक्षकांना सक्त सुचना दिल्याने स्वच्छता निरीक्षक फिल्डवर जाऊन पाहणी करीत असल्याचे दिसून आले आहे.

**तरुण भारत इफेक्ट**

दै. तरुण भारत वृत्तपत्रातच्या माध्यमातून जनतेच्या विविध प्रश्नांवर बातम्या प्रकाशित करुन जनतेच्या समस्या निराकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यात दि १८ जानेवारी रोजी सुध्दा शहरातील स्वच्छतेसंदर्भात भिंतीवर स्वच्छता सर्वेक्षणाची ब्रॅण्डिंग, जमिनीवर मात्र घाणीचे साम्राज्य या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध केली होती. या बातमीत वास्तव परिस्थितीचे विदारक परिस्थिती सांगितली. यामध्ये प्रशासन, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची भूमिका स्पष्ट केली होती. ही बातमी अखेर प्रशासनाला जागे करणारी ठरली आहे. बातमी प्रसिद्ध होताच नगरपरिषद देगलूर खडबडून जागे झाले आणि भाजी मार्केट परिसरात तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे.

नगरेश्वर मंदिराच्या पाठीमागील भाजी मार्केट परिसरात साचलेला कचरा, दुर्गंधी, उकिरडे आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. याबाबत तरुण भारत ने वास्तवदर्शी वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर तातडीने नगरपरिषदेचे कर्मचारी, स्वच्छता कामगार आणि संबंधित विभाग प्रत्यक्ष मैदानात उतरले. संपूर्ण परिसरातील कचरा उचलण्यात आला. विशेषतः मुख्याधिकारी निलम कांबळे यांनी स्वच्छतेसंदर्भात स्वच्छता निरीक्षकांना सक्त सुचना दिल्या. विशेष म्हणजे या बातमीच्या परिणामानंतर शहरातील स्वच्छतेची जबाबदारी असलेले स्वच्छता निरीक्षकही अधिक सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता



निरीक्षकांनी प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी सुरू केली असून नियमित स्वच्छता होण्यासाठी सूचना दिल्या जात आहेत. अनेक ठिकाणी कामाला गती मिळाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

**शहरवासीयांनीही 'जबाबदारीचा' हात पुढे करावा !**

तथापि, केवळ बातमी आल्यानंतरच स्वच्छता करून थांबणे योग्य नसून ही प्रक्रिया सातत्याने सुरू राहणे आवश्यक आहे. नगरपरिषद कर्मचाऱ्यांबरोबरच शहरातील नागरिकांचीही जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे. कचरा रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी किंवा बाजारपेठेत टाकू नये, ओला व सुका कचरा वेगळा ठेवावा, सार्वजनिक स्वच्छतेची काळजी घ्यावी, अशी जागरूक भूमिका नागरिकांनी घेतल्यास शहर खऱ्या अर्थाने स्वच्छ, सुंदर आणि समृद्ध होऊ शकतो. त्यामुळे शहरवासीयांची कचरा वाहक घंटागाडीत कचरा टाकावा. गाडी येण्यास विलंब होत असेल तर थोडीशी वाट पहावी, परंतु कचरा रस्त्यावर टाकू नये. नगरपरिषदेचे कर्मचारी अनेक ठिकाणी स्वच्छता करीत असतात, साचलेला कचरा उचलत असतात. त्याच ठिकाणी बहुतांश नागरिक घरातील कचरा टाकतात. त्यामुळे स्वच्छतेची मोहीम मोडकळीस पडते. स्वच्छतेसाठी शहरवासीयांकडूनही 'जबाबदारीचा' हात पुढे असला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने स्वच्छ आणि सुंदर शहर होऊ शकेल. स्वच्छ भारत अभियान हे केवळ भिंतीवरील घोषवाक्य किंवा रंगरंगोटीपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून दिसावे, हीच अपेक्षा व्यक्त होत आहे.